नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २८० | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com

अनंत चतुर्दशी

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

डोळ्यात आले अश्रू बाप्पा
आम्हाला नका विसरु,
आनंदमय करुन चालले तुम्ही
पुढल्या वर्षी आम्ही
तुमची वाट पाहू
अनंत चतुर्दशी निमित्त
सर्व गणेश भक्तांना
हार्दिक शुभेच्छा..!



शुक्रवार, दि. २५ सप्टेंबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## उद्या अंक नाही

आज शुक्रवार, दि. २५ सप्टेंबर २०२६ "अनंत चतुर्दशी" निमित्त दै. स. गांवकरी कार्यालयाला सुट्टी असल्याने शनिवार, दि. २६ सप्टेंबर २०२६ रोजीचा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, विक्रेते, एजंट यांनी नोंद घ्यावी.

- संपादक



# विदर्भातील दळणवळणाला 'समृद्धी'

मुंबई : (स. गांवकरी)

विदर्भातील दळणवळण व्यवस्था मजबूत करण्यासाठी नागपूर – मुंबई समृद्धी महामार्गाचा विकास करण्यासह अन्य काही रस्ते प्रकल्प महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) हाती घेतले आहेत. त्यानुसार नागपूर – गोंदिया, नागपूर – चंद्रपूर आणि भंडारा – गडचिरोली या तीन द्रुतगती महामार्गांच्या माध्यमातून समृद्धी महामार्गाचा विस्तार केला जाणार आहे. तसेच खनिज वाहतुकीला वेग देण्यासाठी एमएसआरडीसीने नवेगाव – सुरजागड द्रुतगती महामार्गही बांधण्याचा निर्णय घेतला आहे. या चारही महामार्गांच्या एकूण ४६ हजार कोटींहून अधिकच्या खर्चास मान्यता देण्यासंबंधीचा शासन निर्णय प्रसिद्ध केला असून बांधकामासाठी १५ दिवसांत निविदा काढण्यात येणार आहे. नागपूर – मुंबई अंतर आठ तासांत पार करता यावे यासाठी एमएसआरडीसीने ७०१ किमीचा समृद्धी महामार्ग बांधला. राज्यातील अधिकाधिक जिल्हे या महामार्गाशी जोडले जावेत आणि दळणवळण व्यवस्थेला बळकटी मिळावी यासाठी अनेक ठिकाणी या महामार्गाचा विस्तार केला जात आहे. यात नागपूर – गोंदिया, नागपूर – चंद्रपूर आणि भंडारा – गडचिरोली या विस्तारित तीन महामार्गांचा समावेश आहे. या महामार्गाच्या संरेखनास मान्यता मिळाल्यानंतर एमएसआरडीसीने या महामार्गांच्या खर्चाचा प्रस्ताव राज्य सरकारकडे मान्यतेसाठी पाठविला होता. त्यानुसार राज्य सरकारने या प्रस्तावाला मान्यता दिली. या चार महामार्गांच्या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळाल्याने आता या प्रकल्पांच्या बांधकामासाठी १५ दिवसांत निविदा काढण्यात येईल, अशी माहिती एमएसआरडीसीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

- चार महामार्गांच्या ४६ हजार कोटी रुपयांच्या खर्चाला प्रशासकीय मान्यता
- पंधरा दिवसांत चारही महामार्गांच्या बांधकामासाठी निविदा

### प्रत्येक महामार्गाच्या खर्चाचे नियोजन असे

भंडारा – गडचिरोली दरम्यानच्या ९४ किमी लांबीच्या सहापदरी महामार्गाच्या १०१४५.५९ कोटी रुपयांच्या, तर नागपूर – चंद्रपूर दरम्यानच्या २०४ किमी लांबीच्या चारपदरी द्रुतगती महामार्गाच्या १७८४७.८६ कोटी रुपयांच्या खर्चास सरकारने मान्यता दिली. तसेच नागपूर – गोंदिया दरम्यानच्या १६२ किमी लांबीच्या सहापदरी द्रुतगती महामार्गाच्या १४८८४.२७ कोटी रुपयांच्या खर्चासही सरकारने मान्यता दिली. विदर्भातील खनिज वाहतूक व्यवस्था बळकट करण्यासाठी एमएसआरडीसीने ८५ किमीचा नवेगाव मोर – सुरजागड द्रुतगती महामार्ग बांधण्याचा निर्णय घेतला आहे. या महामार्गाच्या ३४२९.२१ कोटी रुपयांच्या खर्चासही सरकारने मंजुरी दिली. या चारही महामार्गांमुळे विदर्भातील विकासाला गती मिळणार आहे.

# मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमारांच्या अडचणी वाढणार?

### कोल्हापुरातून पहिलं आव्हान, खंडपीठात याचिका दाखल

मुंबई : (स. गांवकरी)



निवडणूक आयोगाच्या पारदर्शकतेवरून देशात राजकीय वातावरण तापलेले असतानाच आता मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या अडचणीत मोठी भर पडली आहे. ज्ञानेश कुमार यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आलेले काही महत्त्वाचे निर्णय आणि प्रशासकीय प्रक्रियांना थेट आव्हान देणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठात दाखल करण्यात आली आहे.

ही महत्त्वपूर्ण याचिका प्रथमेश गोपाळ गवाणकर, गौरव सूर्यकांत नाखरेकर, आदेश शशिकांत भाटकर आणि स्मिताली निलेश नार्वेकर यांनी दाखल केली आहे. याचिकाकर्त्यांच्या बाजूने प्रसिद्ध कायदेतज्ज्ञ ॲड. असीम सरोदे यांच्यासह वकिलांचे पथक न्यायालयात बाजू मांडत आहे. या याचिकेशी संबंधित प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे आहेत, 14 वेळा आक्षेप: निवडणूक आयोगाच्या दोन इतर आयुक्तांनी विविध निर्णय आणि प्रक्रियांबाबत तब्बल 14 वेळा तीव्र आक्षेप नोंदवल्याचा दावा या याचिकेत करण्यात आला आहे. मतदार यादीतील गैरव्यवहार: मतदार नोंदणी, मतदारांची नावे अचानक वगळणे, मतदार यादीचा डेटाबेस, ERO कार्यपद्धती आणि ECINet प्रणालीशी संबंधित गंभीर प्रश्न या याचिकेद्वारे उपस्थित करण्यात आले आहेत. 'मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्त कायदा, 2023' अंतर्गत निवडणूक आयोगाचे निर्णय सामूहिक पद्धतीने घेणे बंधनकारक आहे. मात्र, या कायद्यातील तरतुदींचे पालन न करता निर्णय एकतर्फी घेतले गेले का? असा थेट कायदेशीर प्रश्न याचिकेत उपस्थित करण्यात आला आहे. या याचिकेद्वारे याचिकाकर्त्यांनी उच्च न्यायालयाकडे काही अत्यंत महत्त्वाच्या मागण्या केल्या आहेत: SIR प्रक्रियेला स्थगिती: महाराष्ट्रात सुरू असलेली एसआयआर (SIR) प्रक्रिया तात्काळ थांबवण्यात यावी. नावे पुनर्स्थापित करणे: एसआयआर प्रक्रियेदरम्यान मतदार यादीतून ज्या मतदारांची नावे अनधिकृतपणे वगळण्यात आली आहेत, ती नावे पुन्हा मतदार यादीत समाविष्ट करावीत.

## थोडक्यात...

### महामंत्रीपदी सतीश धोंड

मुंबई (स. गांवकरी) : भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) संघटन महामंत्री पदावर अजय जामवाल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जामवाल यांनी यापूर्वी मध्य प्रदेश आणि छत्तीसगड या दोन राज्यांच्या संघटन महामंत्रीपदाची जबाबदारी सांभाळली आहे. जामवाल आता महाराष्ट्र भाजपच्या संघटनाची सूत्रे हाती घेतील. महाराष्ट्र भाजपमध्ये काही काळापासून प्रदेश संघटन महामंत्रीपद रिक्त होते. संघटनात्मक बांधणी, पक्षाच्या विविध आघाड्यांमध्ये समन्वय आणि आगामी राजकीय आव्हानांच्या पार्श्वभूमीवर या पदावर कोणाची नियुक्ती होते, याकडे लक्ष लागले होते. या पार्श्वभूमीवर जामवाल यांची नियुक्ती महत्त्वाची मानली जात आहे. जामवाल यांनी यापूर्वी मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमध्ये भाजपच्या संघटनात्मक विस्तारात काम केले आहे. त्यामुळे महाराष्ट्रासारख्या मोठ्या आणि राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या राज्यात त्यांचा अनुभव पक्षासाठी उपयोगी ठरणार आहे. मुंबई हे त्यांचे केंद्र असल्याने प्रदेश पातळीवरील संघटनात्मक कामकाजावर त्यांचा थेट भर राहील. धोंड यांच्याकडे विदर्भाची जबाबदारी भाजपच्या प्रदेश सहसंघटन महामंत्रीपदी सतीश धोंड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचे केंद्र नागपूर असेल. महाराष्ट्राच्या संघटनात्मक रचनेत मुंबईबरोबरच नागपूरला स्वतंत्र महत्त्व देण्यात आले आहे.

### काँग्रेसचे आय आयटी समोर आंदोलन

मुंबई (स. गांवकरी) : आयआयटी मुंबईमधील विद्यार्थी साहिल वाकोडे या विद्यार्थ्याचा जातीवाचक आणि मानसिक छळ केल्यामुळेच आत्महत्या केल्याचा आरोप करीत मुंबई काँग्रेस अध्यक्षा खासदार वर्षा गायकवाड यांनी आयआयटी मुंबईबाहेर आंदोलन केले. पोलिसांनी गायकवाड यांच्यासह आंदोलक कार्यकर्त्यांना बाहेरच्या बाहेर अडवून त्यांची धरपकड केली. या प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी गायकवाड यांनी केली. मुंबई काँग्रेसने साहिल वाकोडे आत्महत्येप्रकरणी आक्रमक भूमिका घेत आज आयआयटी पवईच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर आंदोलन केले. आंदोलन सुरु असतानाच पोलिसांनी कार्यकर्त्यांची धरपकड केली, धक्काबुकी केली व त्यांना ताब्यात घेतले, त्यानंतर खा. वर्षा गायकवाड, प्रवक्ते सुरेशचंद्र राजहंस, जिल्हा अध्यक्ष केतन शाह, भावना जैन, अर्शद आझमी, राजपती यादव, अवनीश सिंग, सुभाष भालेराव, विक्रम सिंग, प्रदूम यादव यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी पोलिस स्टेशनमध्येच ठिय्या आंदोलन केले व पोलीसांच्या दडपशाहीचा निषेध केला. यावेळी प्रसार माध्यमांशी बोलताना वर्षा गायकवाड यांनी आयआयटी सारख्या संस्थेतही रा. स्व. संघाचा शिरकाव झाला असून जात व धर्माचा शैक्षणिक संस्थांमध्ये शिरकाव होणे अत्यंत चिंताजनक आहे. साहिल वाकोडे याने अत्याचाराला कंटाळून जीवन संपवले, अशा घटना या संस्थेत होत आहेत हेच गंभीर आहे. यापूर्वीही आयआयटी मुंबईत काही विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, पण संस्थेने यातून काहीच धडा घेतला नाही. साहिलला न्याय मिळालाच पाहिजे यासाठी काँग्रेस हा लढत आहे व साहिलला न्याय मिळेपर्यंत आम्ही गप्प बसणार नाही.

# सीलबंद पोत्यात खताचं वजन कमी, शेतकऱ्यांची होतेय फसवणूक

सातारा : (स. गांवकरी)

राज्यातील बहुतांश जिल्ह्यात यंदा पावसाने पूर्णतः दडी मारल्याने शेतकरी हवालदील झाला आहे. आता, पावसाळा अंतिम टप्प्यात आल्याने पाऊस पडला तरी पिकांचं नुकसान हे निश्चित मानलं जातंय. त्यातच, दुष्काळात तेरावा महिना म्हणतात तसा प्रकार साताऱ्यात उघडकीस आला आहे. हमाली करणाऱ्या विक्रम सावंत यांनी सोशल मीडियावर एका खताच्या पोत्यात खतांचे वजन कमी असल्याचा व्हिडीओ तयार केला अन् शेतकऱ्यांची फसवणूक करणारा प्रकार उघडकीस आला आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या रील्स पाहून कृषी विभाग खडबडून जागे झालं आहे. चक्क सीलबंद असलेल्या खतांच्या पोत्यात 3 ते 5 किलो खत कमी असल्याचे समोर आलं आहे. विशेष म्हणजे शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टींनीही व्हिडिओ पाहिला आहे. कराड तालुक्यातील पाली या गावामधील आबा गिरणवाला ॲग्रो मॉल या कृषी सेवा दुकानात कोरोमंडल या कंपनीच्या खतांचा माल आला असता, त्या दुकानातील हमालाने तो माल दुकानात उतरवून घेत असताना त्याचे वजन केले. त्यावेळी, कित्येक खतांच्या गोणीत 50 किलो पेक्षा 3.5 ते 5 किलोने वजन कमी दिसून आले. याविषयी त्या हमालाने एक व्हिडिओ बनविला आणि तो त्याने त्याच्या इन्स्टाग्रामवर पोस्ट केला.



- हमालाचा व्हिडिओ व्हायरल, राजू शेट्टींचा फोन

# दुचाकीवरुन आलेल्या तिघांनी पिस्तुलचा धाक दाखवून लुटले

### विद्यार्थ्यांना लुटणारी टोळी जेरबंद, दोन विधिसंघर्ष बालक

सोलापूर : (स. गांवकरी)

जिल्ह्यात गेल्या काही महिन्यात गावठी पिस्तुलसहआरोपींना पकडल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यातच, आता सोलापूर शहरात विद्यार्थ्यांना पिस्तुलचा धाक दाखवून लुटणाऱ्या टोळीचा फौजदार चावडी पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या कारवाईत एका आरोपीसह दोन विधी संघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेत 1 लाख 4 हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दरम्यान, एका दुचाकीवरुन येत पिस्तुलचा धाक दाखवून तिघांनी फिर्यादीची लूट केली होती. याप्रकरणी, गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणातील फिर्यादी आयान डोणगावकर आणि 4 मित्र एमआयटी कॉलेजजवळ थांबले असताना ॲक्सेस दुचाकीवरून आलेल्या तिघांनी पिस्तुलचा धाक दाखवून त्यांच्याकडून 3 हजार 500 रुपये हिसकावून पोबारा केला होता. याप्रकरणी गुन्हा दाखल होताच सोलापूरच्या फौजदार चावडी पोलीस स्थानकाच्या पोलिसांनी कार्यवाही सुरु केली. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास करत पुणे येथील चाफेकर चौकातून एका विधी संघर्षग्रस्त बालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्याकडे केलेल्या चौकशीत त्याने आपल्या साथीदारांची माहिती दिली. त्यानंतर बाळे ब्रिज येथून प्रज्वल गवळी आणि दुसऱ्या अल्पवयीन आरोपीला अटक करून त्यांच्याकडून 1 गावठी पिस्तुल, 4 जिवंत काडतुसे आणि गुन्ह्यात वापरलेली दुचाकी हस्तगत करण्यात आली. याप्रकरणातील आरोपी प्रज्वल वित्तेश गवळी सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. पुढील तपास फौजदार चावडी पोलीस करत आहेत. रासायनिक ताडी विक्रीच्या विरोधात सोलापुरात प्रहार संघटना आक्रमक झाल्याचं दिसून आलं. सोलापुरातील राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यालसमोर प्रहार संघटनेचे आंदोलन केले. उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यालयाच्या फलकावर आणि आयुक्तांच्या प्रतिमेवर रासायनिक ताडी ओतून निषेध नोंदवला गेला. 'ताडीच्या नावाखाली रासायनिक ताडी विक्री करून लोकांना मारण्याचे लायसन्स उत्पादन शुल्क विभागाकडून दिलं जातंय', अनेक वेळा तक्रार करून देखील केवळ महसूल मिळतं म्हणून कोणतीही कारवाई उत्पादन शुल्क विभागामार्फत केली जातं नाही'. याविरोधात आज आम्ही आंदोलन करत राज्य उत्पादन शुल्क विभागाचा निषेध व्यक्त करतं आहोत, असे प्रहार संघटनेनं म्हटलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुष्काळाची पाहणी केली त्यांनी शेतकऱ्यांना ताडी विक्री करण्याचे लायसन्स द्यावे. रासायनिक ताडी विक्री करण्याचे लायसन्स देणारं असाल तर शेतकऱ्यांना अफू आणि गांजा लावण्याची परवानगी द्या, अशी प्रतिक्रिया देखील प्रहार संघटनेचे शहराध्यक्ष अजित कुलकर्णी यांनी दिली.



# लघुउद्योगांसाठी पर्यावरणीय संमतीची प्रक्रिया सुलभ

मुंबई : (स. गांवकरी)

उद्योग सुरू करण्यापूर्वी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून घ्यावी लागणारी पर्यावरणीय संमती मिळविण्याची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यात आली आहे. अधिसूचित औद्योगिक वसाहती किंवा औद्योगिक क्षेत्रांमध्ये असलेल्या सूक्ष्म आणि लघुउद्योगांना स्वप्रमाणित अर्ज सादर केल्यानंतर उद्योग सुरू करण्यासाठी आवश्यक संमती मिळाली असे गृहीत धरण्यात येणार आहे. जलप्रदूषण आणि वायुप्रदूषण नियंत्रण कायद्यांनुसार आवश्यक संमती तसेच विविध प्रकारच्या कचरा व्यवस्थापनासाठी लागणाऱ्या परवानग्यांची प्रक्रिया एकत्रित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. उद्योगांना पर्यावरणीय संमती मिळविताना लागणारा वेळ आणि प्रशासकीय प्रक्रिया कमी करणे, हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश आहे. संमतीची प्रक्रिया सुलभ केली असली तरी प्रदूषण नियंत्रणाच्या अटी, पर्यावरणीय नियम आणि संबंधित कायद्यांचे पालन करण्याची जबाबदारी उद्योगांवर कायम राहणार आहे. केंद्र सरकारच्या २०२३च्या जनविश्वास कायद्यानंतर जल व वायुप्रदूषण नियंत्रण कायद्यांमध्ये काही बदल करण्यात आले. त्यानंतर केंद्राने संमती देण्याबाबत मार्गदर्शक सूचना जारी केल्या. २०२६ मध्ये त्यात सुधारणा करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सुचविलेल्या बदलांचा विचार करून आता सुधारित तरतुदी करण्यात आल्या आहे.



स्थानिक स्वराज्य संस्था आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी संमती शुल्क ठरविताना सांडपाण्याचे प्रमाण हा प्रमुख निकष करण्यात आला आहे. दहा हजार लिटरपर्यंत सांडपाणी निर्माण करणाऱ्या गृहनिर्माण प्रकल्पांना वार्षिक पाच हजार रुपये, इतर प्रकल्पांना ७५०० रुपये शुल्क आकारले जाईल. दहा ते ५० हजार लिटर सांडपाण्यासाठी अनुक्रमे १५ हजार आणि २२,५०० रुपये शुल्क राहील. पाच लाख ते दहा लाख लिटर सांडपाण्यासाठी अनुक्रमे ६५ हजार आणि ९७,५०० रुपये शुल्क आकारण्यात येईल. दररोज २५ लाख लिटरपेक्षा अधिक सांडपाणी निर्माण करणाऱ्या प्रकल्पांसाठी गृहनिर्माण प्रकल्पांना चार लाख, तर इतर प्रकल्पांना सहा लाख रुपये वार्षिक शुल्क राहील. केवळ डिझेलवर चालणारे विद्युत जनित्र हा ऊर्जेचा स्रोत असलेल्या आस्थापनांसाठीही स्वतंत्र शुल्करचना करण्यात आली आहे. २५० किलोवॅटपर्यंतच्या जनित्रासाठी कोणतेही वार्षिक शुल्क आकारले जाणार नाही. २५० ते ५०० किलोवॅट क्षमतेसाठी एक हजार, ५०० किलोवॅट ते एक मेगावॅटसाठी दोन हजार, तर एक मेगावॅट किंवा त्यापेक्षा अधिक क्षमतेसाठी पाच हजार रुपये वार्षिक शुल्क राहील. राज्य, केंद्र किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालकीच्या आणि त्यांच्यामार्फत चालविल्या जाणाऱ्या आरोग्य संस्थांना संमती शुल्कातून पूर्णपणे वगळण्यात आले आहे. वैद्यकीय महाविद्यालये, संशोधन संस्था तसेच जैववैद्यकीय कचरा निर्माण करणाऱ्या उद्योगांसाठी भांडवली गुंतवणुकीच्या आधारे एकत्रित संमती व परवानगी देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

# गोकुळचं रणशिंग फुंकलं! चंद्रकांत पाटलांनी सांगितला निवडणुकीचा प्लॅन

कोल्हापूर : (स. गांवकरी)



कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघ अर्थाच गोकुळच्या निडणुकीला वेग आला आहे. राजकीय नेत्यांनी हालचालींना सुरुवात केलीय. निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून सतेज पाटील विरुद्ध महायुती अशी लढत रंगणार आहे. अशातच मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. आम्ही महायुतीचे सगळे पक्ष एकत्र आहोत, ही निवडणूक बिनविरोध होणार नसल्याचं वक्तव्य पाटील यांनी केलं आहे. महायुतीमध्ये कधीही शंका नव्हती. राजर्षी शाहू शेतकरी विकास आघाडी या नावाने ही निवडणूक लढवणार आहे. उद्या सकाळी सगळे पक्ष करवीर निवासिनी श्री अंबाबाई देवीच्या दर्शनाला जाऊन प्रचाराचा नारळ फुटणार असल्याची माहिती चंद्रकांत पाटील यांनी दिली आहे. आजची बैठक ही कोणाला किती जागा यासाठी प्राथमिक बैठक झाली आहे. आता आमच्यात मोठा भाऊ, छोटा भाऊ कोणीही नाही. आम्ही सगळे महायुतीचे पक्ष एकत्र आहोत ही निवडणूक बिनविरोध होणार नाही. 8 ऑक्टोबरला चित्र स्पष्ट होईल असे पाटील म्हणाले. आम्ही सगळे भाऊ एकत्र आहेत. मात्र एखाद्या जत्रेमध्ये जर एखादा भाऊ हरवला असेल तर त्या भावाने देखील त्याची इच्छा बोलून दाखवली पाहिजे असे चंद्रकांत पाटील म्णाले. अदृश्य शक्तीबाबत बोलताना पाटील म्हणाले की, रात गई.. बात गई. ज्या वेळी आम्ही सगळे येऊन प्रचार करु तशी आमच्यातील निगेटिव्ह संपेल असेही ते म्हणाले. सगळे निर्णय कोल्हापुरात घेतले जातील. आमच्यावर कोणी कंट्रोल ठेवते असे नसते असेही पाटील म्हणाले. गेल्या निवडणुकीत काँग्रेस नेते सतेज पाटील यांनी जिल्ह्यातील सर्व विरोधकांना एकत्र आणून महादेवराव महाडिक यांची अनेक वर्षांची एकछत्री सत्ता उलथवून लावली होती. मात्र, गेल्या 5 वर्षांत राज्यातील बदललेल्या राजकीय समीकरणांमुळे गोकुळमधील राजकीय समीकरणेही पूर्णपणे बदलली आहेत.

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी

## संपादकीय

# गणेशोत्सवातून काय बोध घेतला?



**गणरायाचे आगमन झाले, भक्तीचा जागर झाला, ढोल-ताशांचा निनाद झाला आणि दहा दिवसांचा उत्सव पाहता पाहता संपला. घराघरांत, मंडळांमध्ये आणि सार्वजनिक ठिकाणी श्री गणेशाची मनोभावे पूजा झाली. विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक उपक्रमांनी वातावरण भारावून गेले. आता अनंत चतुर्दशीच्या विसर्जनानंतर उत्सवाची सांगता झाली असली, तरी या उत्सवातून आपण नेमका काय बोध घेतला, हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे.**

गणेशोत्सव म्हणजे केवळ सजावट, रोषणाई, ढोल-ताशे, मिरवणुका आणि आरती नव्हे. गणेशोत्सव हा समाजाला एकत्र आणणारा, विचारांना दिशा देणारा आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव करून देणारा उत्सव आहे. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाला सामाजिक एकतेचे आणि जनजागृतीचे स्वरूप दिले. त्या परंपरेचा वारसा आपण पुढे नेत असताना त्यामागचा सामाजिक उद्देश कितपत जपला, याचा विचार करणे आवश्यक आहे. श्री गणेशाला 'विघ्नहर्ता' म्हटले जाते. मात्र समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, भ्रष्टाचार, प्रदूषण, गुन्हेगारी, बेरोजगारी आणि सामाजिक असमानता ही खरी विघ्ने आहेत. या विघ्नांविरुद्ध लढण्याची प्रेरणा गणेशोत्सवातून मिळाली पाहिजे. केवळ गणपतीसमोर हात जोडून आपल्या समस्या दूर व्हाव्यात, अशी अपेक्षा करण्यापेक्षा त्या समस्या दूर करण्यासाठी आपण स्वतः काय योगदान देणार, हा प्रश्न महत्त्वाचा आहे.

गणेशोत्सवाने आपल्याला एकतेचा धडा दिला. मोठ्या सार्वजनिक मंडळांपासून छोट्या सोसायट्यांपर्यंत विविध समाजघटक एकत्र आले. जात, धर्म, भाषा, आर्थिक परिस्थिती यांचे भेद बाजूला ठेवून अनेकांनी उत्सवात सहभाग घेतला. हीच एकजूट वर्षभर सामाजिक प्रश्नांवर दिसली, तर समाजातील अनेक समस्या सहज सोडवता येऊ शकतात. उत्सवापुरती एकता नको; ती समाजजीवनाचा कायमस्वरूपी भाग बनली पाहिजे.

यंदाच्या उत्सवात पर्यावरणाचा प्रश्नही पुन्हा प्रकर्षाने समोर आला. ध्वनिप्रदूषण, पाण्याचे प्रदूषण, प्लास्टिकचा वाढता वापर आणि विसर्जनानंतर निर्माण होणारा कचरा या समस्यांकडे दुर्लक्ष करून भक्ती पूर्ण होऊ शकत नाही. श्री गणेशाची मूर्ती पर्यावरणपूरक असावी, निर्माल्याचे योग्य व्यवस्थापन व्हावे, प्लास्टिकचा वापर कमी व्हावा आणि सार्वजनिक स्वच्छता राखली जावी, हा संदेश प्रत्येक गणेश मंडळाने आणि प्रत्येक नागरिकाने स्वीकारला पाहिजे.

गणेशोत्सवातील सर्वात महत्त्वाचा बोध म्हणजे शिस्त. मिरवणुकीत शिस्त, वाहतुकीत शिस्त, ध्वनिवर्धकांचा वापर करताना शिस्त आणि सार्वजनिक ठिकाणी वावरताना जबाबदारी हीच खरी गणेशभक्ती आहे. भक्तीच्या नावाखाली इतरांना त्रास होणार नाही, याची काळजी घेणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी आहे.

युवकांचा सहभाग हा गणेशोत्सवाचा आणखी एक महत्त्वाचा भाग आहे. मंडळांच्या माध्यमातून तरुणांनी सामाजिक उपक्रम, रक्तदान, आरोग्य शिबिरे, शैक्षणिक मदत, गरजू विद्यार्थ्यांना साहित्य वाटप, वृक्षारोपण अशा उपक्रमांना चालना दिली, तर उत्सवाचे सामाजिक मूल्य अधिक वाढेल. तरुणाईची ऊर्जा केवळ मनोरंजनासाठी नव्हे, तर समाजनिर्मितीसाठी वापरली गेली पाहिजे.

गणेशोत्सव संपला म्हणजे गणरायाचा संदेशही संपला, असे होऊ नये. 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष करताना आपण घेतलेली सामाजिक जबाबदारी विसरता कामा नये. घरातील गणपती विसर्जित झाला, मंडप उतरले आणि रोषणाई बंद झाली; पण मनातील चांगुलपणा, शिस्त, एकता, स्वच्छता आणि सामाजिक बांधिलकी कायम राहिली पाहिजे.

गणरायाला निरोप देताना प्रत्येकाने एक संकल्प करायला हवा पुढील वर्षी गणेशोत्सव अधिक मोठा करण्यापेक्षा तो अधिक अर्थपूर्ण करू. आवाजापेक्षा विचार मोठा करू, दिखाव्यापेक्षा सामाजिक कार्याला महत्त्व देऊ, स्पर्धेपेक्षा सहकार्य वाढवू आणि उत्सवापेक्षा समाजहिताला प्राधान्य देऊ. कारण गणेशोत्सवाचा खरा अर्थ दहा दिवसांच्या उत्सवात नसून, त्या दहा दिवसांत मिळालेला संदेश पुढील ३६५ दिवसांच्या जीवनात आचरणात आणण्यात आहे.

गणरायाला निरोप दिला आहे; पण गणरायाने दिलेला बोध मनातून जाऊ देऊ नका!

# थोडक्यात पण महत्वाचे



## गणेशोत्सवातून उलगडली चाळ संस्कृतीची अनोखी झलक

■ ज्ञानेश्वर चिंतेवार यांच्या घरातील देखाव्यात परंपरा, संस्कृती आणि जुन्या जीवनशैलीचे दर्शन

भिवंडी (स. गांवकरी) : भिवंडीतील मानसरोवर परिसरात यंदाच्या गणेशोत्सवानिमित्त ज्ञानेश्वर चिंतेवार यांच्या घरी साकारण्यात आलेल्या आकर्षक देखाव्याने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले आहे. पारंपरिक चाळ संस्कृती, जुन्या काळातील जीवनपद्धती आणि परस्पर सहकार्याची भावना या देखाव्यातून प्रभावीपणे मांडण्यात आली आहे. मुंबईसह परिसरातील जुन्या चाळींमध्ये दिसणारे सामूहिक जीवन, शेजारधर्म, सण-उत्सवातील सहभाग आणि एकमेकांना मदतीचा हात देण्याची परंपरा यांची सुंदर मांडणी या देखाव्यात करण्यात आली आहे. घरातील गणरायाच्या मूर्तीभोवती उभारण्यात आलेल्या विविध प्रतिकृती आणि सजावटीतून जुन्या काळातील चाळीचे वातावरण जिवंत करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, देखाव्यातील बारकावे लक्षवेधी ठरत असून पारंपरिक वस्तू, घरांची रचना, चाळीतील दैनंदिन जीवन आणि सांस्कृतिक वातावरण यांचे चित्रण करण्यात आले आहे. त्यामुळे गणेशदर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना केवळ धार्मिक अनुभव न मिळता जुन्या चाळ संस्कृतीची आठवणही करून देणारा हा देखावा ठरत आहे. आजच्या बदलत्या जीवनशैलीत लोप पावत चाललेल्या सामूहिकता, आपुलकी आणि परस्पर सहकार्याच्या मूल्यांना या देखाव्यातून उजाळा देण्यात आला आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून संस्कृती आणि परंपरेची जपणूक करण्याचा ज्ञानेश्वर चिंतेवार यांचा हा उपक्रम परिसरात कौतुकाचा विषय ठरत आहे.



## जिल्ह्यात मुख्यमंत्री बळीराजा शेत पानंद रस्त्यांना सुरवात

रावेर (स. गांवकरी) : संपूर्ण जळगाव जिल्हाभरात विधान परिषद आमदार नंदुभाऊ माहाजन यांच्या विषेश प्रयत्नांनी रावेर तालुक्यात मुख्यमंत्री बळीराजा शेत पानंदरस्ता योजने अंतर्गत आज रावेर तालुक्यातील थोरगव्हाणयेथे शेतरस्त्याच्या कामास आज सुरुवात करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना शेतापर्यंत जाण्या-येण्यासाठी चांगला रस्ता उपलब्ध व्हावा, शेतीमालाची वाहतूक सुलभ व्हावी आणि शेतकऱ्यांची गैरसोय दूर व्हावी, या उद्देशाने हे महत्त्वपूर्ण काम आहे. याबद्दल मा.मुख्यमंत्री महोदय फडवणीस साहेब मा.महसूल मंत्री महोदय चंद्रशेखर बावनकुळे माननीय पालकमंत्री गुलाबभाऊ पाटील,मा.मंत्री गिरीश भाऊ महाजन,केंद्रीय मंत्री मा.रक्षाताई खडसे, मा.आ.चंद्रकांतभाऊ पाटील मा.आमदर अमोलभाऊ जावळे, भाजपा तालुकाध्यक्ष दुर्गादास पाटील, तसेच महायुती सरकारचे व महसूल विभाग, भूमि अभिलेख विभाग,अधिकारी व कर्मचाऱ्यांचे शेतकऱ्यांनी विशेष आभार मानले आहे . थोरगव्हाण येथे रस्त्याच्या भूमी पूजन प्रसंगी थोरगव्हाण सरपंच सौ,रेखाताई तायडे,श्री मधुकर पाटील , किसान मोर्चा जिल्हा सरचिटणीस श्री राहुल महाजन,श्री विनायक कोळी,,महिला मोर्चा तालुकाध्यक्ष सौ आशाताई मोरे,सौ उज्वलाताई, श्री सचिन चौधरी,श्री नितीन पाटील,ग्राम महसूल अधिकारी,जगदीश पाटील सनी पाटील,जयश पाटील,दिपक बाविस्कर,राजू शिंदे,तसेच ग्रामस्थ व शेतकरी पदाधिकारी उपस्थित होते.

## नॅचरल डायमंड कौन्सिल आता 'द डायमंड कलेक्टिव्ह' या नव्या रूपात!



लंडन (स. गांवकरी) : नॅचरल डायमंड कौन्सिलने 'द डायमंड कलेक्टिव्ह' या नव्या नावासह आपल्या जागतिक धोरणाची घोषणा केली आहे. नैसर्गिक हिऱ्यांना संस्कृतीशी पुन्हा जोडणे, ग्राहकांचा विश्वास दृढ करणे आणि त्यांच्याविषयीचे आकर्षण दीर्घकालीन मागणीत रूपांतरित करणे, हा या धोरणाचा मुख्य उद्देश आहे. हिऱ्यांची दुर्मीळता, त्यांच्याशी जोडलेल्या भावना आणि कायमस्वरूपी नात्यांचे महत्त्व ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी उद्योगातील विविध घटकांना एकत्र आणण्यात येणार आहे. संस्थेच्या नव्या मुख्य कार्यकारी अधिकारी अँबर पेपर यांनी गेल्या सहा महिन्यांत हिरे उत्पादक, किरकोळ विक्रेते, विविध ब्रँड्स, सर्जनशील क्षेत्रातील व्यक्ती आणि ग्राहकांशी केलेल्या चर्चेतून हे धोरण तयार करण्यात आले आहे. लक्झरी उत्पादनांविषयी ग्राहकांचा दृष्टिकोन आणि खरेदीच्या पद्धती बदलत असल्याच्या पार्श्वभूमीवर संस्थेने ही नवी दिशा स्वीकारली आहे.

# गोमाता पतसंस्थेची सर्वसाधारण सभा संपन्न




आळेफाटा : (स. गांवकरी)

पुणे व ठाणे जिल्हा कार्यक्षेत्र असणाऱ्या आळेफाटा (ता. जुन्नर) येथील गोमाता ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेने यावर्षी सभासदांना ११ टक्के लाभांशसह दीपावली भेटवस्तू देण्याची घोषणा केली आहे अशी माहिती पतसंस्थेचे अध्यक्ष सुरेश गडगे यांनी दिली. गोमाता पतसंस्थेची २१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सुरेश गडगे यांच्या अध्यक्षतेखाली अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली.सभेसाठी पतसंस्थेचे उपाध्यक्ष राहुल खोकले, मानद सचिव रवींद्र गडगे, कोंडीभाऊ वामन, अशोक गडगे, गजानन गडगे, भानुदास गडगे, दत्तात्रय गडगे, नितीन चौगुले, श्रीमती शांताबाई गडगे, संगिता शिंदे, आशा आल्हाट ,अर्जुन अमुप, शिवाजी गडगे आदी संचालक व सभासद, कर्मचारी वृंद उपस्थित होते. पतसंस्थेचे अध्यक्ष सुरेश गडगे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. पतसंस्थेमध्ये २६१२ सभासद आहेत. अधिकृत भागभांडवल ५ कोटी रुपये असून वसूल भागभांडवल १ कोटी ९८ लाख रुपये इतके आहे. अग्निदिव्यचे संपादक अजित पानसरे,सुरेशशेठ चौगुले,वडगाव आनंदचे उपसरपंच संतोषशेठ पादिर,गोमाता दूध संस्थेचे चेअरमन गणेश वाघमारे,पिराजीशेठ भोर,गोरक्षनाथ कड आदींनी मनोगत व्यक्त केले. सभेसाठी सौ अमृता सुरेश गडगे ,वडगाव आनंदचे माजी सरपंच पी.एल.गडगे,पत्रकार गोपीनाथ शिंदे, दशरथ वाळुंज, रघुनाथ चौगुले,पोपट नाना गुंजाळ,गोरक्षनाथ भुजबळ, सनत सुरेशशेठ गडगे,संदीपशेठ गडगे, सौ.ऐश्वर्या गडगे यांच्यासह सभासद व संस्थेचे सर्व अधिकारी, कर्मचारी वृंद सल्लागार आदी उपस्थित होते. संस्थेचे अहवाल वर्षात २७ कोटी ३२ लाख ६१ हजार रुपयांच्या ठेवी असून या वर्षीचे कर्ज वाटप ८ कोटी ५७ लाख ५९ हजार रुपये इतके झाले आहे. संस्थेला 'अ ' वर्ग आहे. दोन लाख रुपयाचा अपघाती विमा उतरविण्यात आल्याचे अध्यक्ष गडगे यांनी सांगितले.

# महाविद्यालयात 'आरंभ २०२६' इंडक्शन कार्यक्रम उत्साहात

आळेफाटा : (स. गांवकरी)




समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, बेल्हे येथे प्रथम वर्ष अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित 'आरंभ २०२६' इंडक्शन कार्यक्रमाची उत्साहात सुरुवात झाली. नव्याने महाविद्यालयीन जीवनात प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी शिक्षणाची दिशा, आधुनिक तंत्रज्ञान, करिअरच्या विविध संधी, कौशल्यविकास आणि व्यक्तिमत्त्व विकासाची ओळख करून देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागप्रमुख प्रा. सागर घुले यांनी केले. 'आरंभ २०२६'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाची सकारात्मक, आत्मविश्वासपूर्ण आणि योग्य दिशेने सुरुवात व्हावी, तसेच अभियांत्रिकी शिक्षणासोबत आवश्यक व्यावसायिक व जीवनकौशल्ये विद्यार्थ्यांनी आत्मसात करावीत, यावर त्यांनी भर दिला. यावेळी मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नवनाथ नरवडे यांनी विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकी शिक्षणाकडे केवळ पदवी मिळविण्याच्या दृष्टीने न पाहता ज्ञान, कौशल्य, नवकल्पना आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करण्याच्या दृष्टीने पाहावे, असे आवाहन केले. अभ्यासक्रमासोबत प्रकल्प, संशोधन, विविध स्पर्धा, उद्योगाभिमुख प्रशिक्षण, संवादकौशल्य आणि टीमवर्क यांना महत्त्व देऊन सर्वांगीण विकासासाठी विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असेही त्यांनी नमूद केले.

प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील विविध विभाग, कार्यालयीन कामकाज तसेच उपलब्ध शैक्षणिक व प्रशासकीय सुविधांची माहिती दिली. प्रवेश, शैक्षणिक कागदपत्रे, परीक्षा, उपस्थिती, शिष्यवृत्ती, विद्यार्थी सेवा आणि विविध विभागांशी संबंधित कामकाजाची प्रक्रिया त्यांनी सोप्या पद्धतीने समजावून सांगितली.

'आरंभ २०२६' अंतर्गत विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता, आधुनिक तंत्रज्ञान, अभियांत्रिकी क्षेत्रातील बदलत्या संधी, करिअर नियोजन, कौशल्यविकास, व्यक्तिमत्त्व विकास आणि उद्योगविश्वाच्या अपेक्षा याबाबत मार्गदर्शन मिळणार आहे. विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून राहुल टेमकर, एआय सोल्युशन्स आर्किटेक्ट, पुणे; ज्ञानेश्वर ढोमसे, संचालक, ज्ञाता एज्युकेशनल रिसर्च अँड काऊन्सेलिंग सेंटर, नारायणगाव; तसेच नितीन सोनवणे, सल्लागार, ऑल इंडिया अॅग्री बिझनेस अँड टेक्नॉलॉजी, पुणे यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभणार आहे. कार्यक्रमास कॅम्पस डायरेक्टर प्रा. राजीव सावंत, प्रशासकीय अधिकारी कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागप्रमुख प्रा. स्नेहा शेगर, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागप्रमुख प्रा. निर्मल कोठारी, इलेक्ट्रिकल विभागप्रमुख प्रा. निलेश नागरे, आर्टिफिशियल इंटेलिजन्स विभागप्रमुख प्रा. निवृत्ती चौधरी, सिव्हिल विभागप्रमुख प्रा.रविंद्र नवले, मेकॅनिकल विभागप्रमुख प्रा. अमोल खतोडे, प्रा. सचिन पोखरकर यांच्यासह विविध विभागांचे प्राध्यापक आणि प्रथम वर्षाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रा. विशाखा वाघचौरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर प्रा. राजू वाकळे यांनी सर्वांचे आभार मानले कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊली शेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके,माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके यांनी शुभेच्छा दिल्या.

# मुलींच्या खो-खो संघाची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

## तालुकास्तरीय स्पर्धेत दमदार कामगिरी; खेळाडूंच्या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन

अकोले : (स. गांवकरी)




अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या मार्गदर्शनाखाली अकोले तालुका क्रीडा असोसिएशनच्या वतीने आयोजित तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत भारतरत्न राजीव गांधी माध्यमिक विद्यालय, धामणगाव आवारी येथील १७ वर्षांखालील मुलींच्या खो-खो संघाने दमदार कामगिरी करत जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रवेश निश्चित केला आहे. स्पर्धेदरम्यान विद्यालयाच्या खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक खेळ, वेग, चपळाई आणि जिद्दीचे दर्शन घडवत प्रतिस्पर्धी संघांवर मात केली. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे राजीव गांधी विद्यालयाच्या मुलींच्या संघाची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या यशामुळे अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. खेळाडूंच्या या यशाबद्दल अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त तथा माजी आमदार वैभवराव पिचड, गिरजाजी जाधव, अध्यक्ष सुनील दातीर, सचिव सुधाकर देशमुख, स्थानिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष शरदराव देशमुख तसेच शिक्षणाधिकारी संपत मालुंजकर यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मंगलाताई कर्पे यांनीही यशस्वी विद्यार्थिनींचे कौतुक करून त्यांना जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. या यशामागे खेळाडूंची मेहनत, जिद्द आणि चिकाटी यांसोबतच मार्गदर्शक शिक्षकांचेही मोलाचे योगदान आहे. खेळाडूंना मार्गदर्शन करणारे पापळ सर आणि श्रीमती गायकवाड मॅडम यांच्या मार्गदर्शनामुळे संघाला उत्कृष्ट कामगिरी करता आली. त्यांच्या योगदानाचेही विविध स्तरांतून कौतुक होत आहे. तालुकास्तरीय स्पर्धेत मिळविलेल्या यशानंतर आता हा संघ जिल्हास्तरीय स्पर्धेतील नव्या आव्हानासाठी सज्ज झाला आहे. जिल्हास्तरावरही उत्कृष्ट कामगिरी करून विद्यालयाचे आणि अकोले तालुक्याचे नाव उज्वल करण्यासाठी खेळाडू प्रयत्नशील आहेत. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी अकोले तालुका क्रीडा संघटनेचे अध्यक्ष योगेश उगले, सचिव दत्तात्रय जाधव, खजिनदार रावसाहेब शेळके, उपाध्यक्ष गणपत धुमाळ तसेच कार्याध्यक्ष सुधीर कानवडे यांचे विशेष योगदान राहिले.

राजीव गांधी विद्यालयाच्या या गुणवंत खेळाडूंच्या यशाबद्दल क्रीडाप्रेमी, शिक्षक, पालक आणि नागरिकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी संघाला शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# थेट कर भरण्याची सुविधा

पुणे : (स. गांवकरी)

IDFC FIRST Bank

■ देशभरातील करदात्यांसाठी कर भरण्याची प्रक्रिया अधिक सोपी, सुरक्षित आणि सुलभ

आयडीएफसी फर्स्ट बँकेने केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाच्या (सीबीडीटी) कर संकलनासाठी असलेल्या पेमेंट गेटवेचे एकत्रीकरण पूर्ण केले आहे. या सुविधेमुळे देशभरातील करदात्यांना विविध डिजिटल तसेच प्रत्यक्ष माध्यमांतून प्रत्यक्ष कर भरणे अधिक सुलभ झाले आहे. प्रत्यक्ष कर भरण्याची प्रक्रिया सोपी आणि सुविधाजनक करण्यासाठी करदाते यूपीआय, क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड तसेच आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या किरकोळ आणि कॉर्पोरेट इंटरनेट बँकिंग सुविधांचा वापर करू शकतात. ऑफलाइन पद्धतीने कर भरण्यास प्राधान्य देणाऱ्या करदात्यांना आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या कोणत्याही शाखेत धनादेश, डिमांड ड्राफ्ट किंवा रोख रकमेच्या माध्यमातून कर भरता येणार आहे. विशेष म्हणजे, इतर बँकांचे ग्राहकदेखील आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या पेमेंट गेटवेद्वारे त्यांच्या संबंधित बँकांच्या इंटरनेट बँकिंग सुविधेचा वापर करून प्रत्यक्ष कराचा भरणा करू शकतात. या सुविधेमुळे करदात्यांचे त्यांच्या बँकेशी असलेले संबंध कोणतेही असोत, कर भरण्याची प्रक्रिया अधिक सुलभ आणि सुविधाजनक होणार आहे. करदात्यांना चलान तसेच कर भरण्याची पुष्टी यासंबंधित कागदपत्रे सहजपणे पाहता आणि डाउनलोड करता येणार आहेत. आयडीएफसी फर्स्ट बँकेचे किरकोळ ठेवी, कार्ड आणि पेमेंट विभागाचे प्रमुख शिरीष भंडारी म्हणाले, "ग्राहकांना त्यांच्या पेमेंटसाठी लवचिकता आणि त्यांच्या पसंतीनुसार विविध पर्याय अपेक्षित असतात.

# पूल नसल्याने रुग्णाला डोलीतून नदी पार करण्याची वेळ

## खिरपाडा-वांगणपाड्यातील दुर्दशा; उपचारासाठी गुजरातमधील माणी रुग्णालय गाठण्याची ग्रामस्थांवर वेळ

नाशिक : (स. गांवकरी)



नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा तालुक्यातील खिर्डी ग्रामपंचायतीअंतर्गत खिरपाडा–वांगणपाडा परिसरातील नागरिकांना आजही मूलभूत दळणवळण सुविधांसाठी संघर्ष करावा लागत आहे. गावाजवळून वाहणाऱ्या पार नदीवर पूल नसल्याने आजारी रुग्णाला चक्क डोलीत झोपवून नदी पार करण्याची वेळ ग्रामस्थांवर आली. या घटनेमुळे दुर्गम भागातील आरोग्य व रस्ते सुविधांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

खिरपाडा येथील भास्कर पांडू तुरे (वय २२) हे गेल्या चार-पाच दिवसांपासून आजारी होते. परिसरात जवळचे रुग्णालय नसल्याने त्यांना उपचारासाठी बाऱ्हे येथे नेणे आवश्यक होते. मात्र, बाऱ्हेकडे जाणारा रस्ता अत्यंत खराब असून वाहन जाण्यास अडचणी असल्याने वाहनचालकही गावापर्यंत येण्यास तयार होत नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. दुसरीकडे गुजरातची हद्द जवळ असल्याने पार नदी ओलांडून गुजरातमधील माणी येथील रुग्णालय गाठणे तुलनेने सोपे पडते. त्यामुळे अखेर ग्रामस्थांनी रुग्णाला डोलीतून नदी पार नेण्याचा निर्णय घेतला. नदी पार केल्यानंतर रुग्णाला सुमारे ५ किलोमीटर पायपीट करून माणी येथील रुग्णालयात नेण्यात आले. रुग्णाला डोलीतून नेण्यासाठी पांडू तुरे, बाळू तुरे, रमेश इजल, प्रभू इजल, लशी निंबारे, पांडू राठड तसेच रुग्णाची आई यांनी खडतर प्रवास केला. नदीकाठचा खडकाळ मार्ग, पाण्याची परिस्थिती आणि रुग्णाची अवस्था यामुळे हा प्रवास अत्यंत धोकादायक ठरला.

सध्या नदीची पाणीपातळी वाढल्यास रुग्णांना नदीतून नेणे आणखी धोकादायक होऊ शकते. महिला, वृद्ध, विद्यार्थी तसेच गर्भवती महिला आणि गंभीर आजारी रुग्णांसाठी ही परिस्थिती जीवघेणी ठरू शकते, अशी चिंता ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

गावापर्यंत रुग्णवाहिका पोहोचणार कशी, हा गंभीर प्रश्नही यानिमित्ताने उपस्थित झाला आहे. खिरपाडा–वांगणपाडा परिसरातील नागरिकांकडून पार नदीवर कायमस्वरूपी पूल, गावापर्यंत डांबरी रस्ता आणि नियमित वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देण्याची मागणी अनेकदा करण्यात आल्याचे ग्रामस्थ सांगतात. मात्र, अद्याप ठोस उपाययोजना झालेली नसल्याची त्यांची तक्रार आहे.

"रुग्णाला उपचारासाठी नदी पार करावी लागणे, ही केवळ एका कुटुंबाची अडचण नाही; हा दुर्गम भागातील आरोग्य, रस्ता आणि दळणवळण व्यवस्थेचा गंभीर प्रश्न आहे," अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

प्रशासनाने केवळ पाहणी न करता खिरपाडा–वांगणपाडा परिसरातील रस्ता व पार नदीवरील पूल यासाठी ठोस आराखडा तयार करून कायमस्वरूपी वाहतूक सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत देवकृपा विद्यालयाचे घवघवीत यश

सेनगाव (स. गांवकरी) : तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत देवकृपा विद्यालयाच्या पाच विद्यार्थ्यांनी आपल्या-आपल्या वजन गटात प्रथम क्रमांक मिळवत विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. या स्पर्धेत सीमा शिवाजी गव्हाणे हिने ५० किलो वजन गटात, वैष्णवी सदाशिव कुरे हिने ४५ किलो वजन गटात, समर्थ लक्ष्मण गडदे याने ४७ किलो वजन गटात, आकाश वसंत भोसारे याने ५५ किलो वजन गटात, तर अमन चांदखा पठाण याने ५७ किलो वजन गटात प्रथम क्रमांक मिळवला. या सर्व विद्यार्थ्यांना विद्यालयाचे क्रीडा शिक्षक यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीमुळे विद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, त्यांच्या यशाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल जिजामाता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माननीय आमदार तानाजीराव मुटकुळे साहेब, सचिव श्री. ज्ञानदेव जगताप साहेब तसेच शिक्षण कामकाज सहसचिव श्री. प्रकाशजी निरगुडे साहेब यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे तसेच क्रीडा शिक्षक श्री काकडे सर यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. गाडे सर व सर्व शिक्षकवृंद यांनीही यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून क्रीडा शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे कौतुक केले. तसेच विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील क्रीडा वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

## तालुकास्तरीय तायक्वांदो स्पर्धा संपन्न

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : पुणे जिल्हा क्रीडा परिषद पुणे,जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय पुणे, व चैतन्य विद्यालय ओतूर यांच्या संयुक्त विद्यमाने जुन्नर तालुका स्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धा ओतूर क्रीडा संकुल हॉल येथे संपन्न झाल्या.या स्पर्धेत तालुक्यातील ९० स्पर्धक सहभागी झाले होते. या उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष ग्राम विकास मंडळ ओतूरचे अध्यक्ष अनिल तांबे हे होते.अशी माहिती मुख्याध्यापक प्रतीक अकोलकर यांनी दिली. या स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा परिषद सदस्या डॉ.छाया तांबे, पंचायत समिती सदस्य प्रशांत डुंबरे यांच्या हस्ते करण्यात आले या स्पर्धेचे पंच म्हणून तायक्वांदो खेळाचे राष्ट्रीय प्रशिक्षक किरण जायकर, धनश्री जायकर यांनी काम पाहिले. या स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्याच्या निमित्ताने उपस्थित ग्राम विकास मंडळ ओतूरचे अध्यक्ष सन्मा.अनिल तांबे,राजेंद्र डुंबरे,सचिव प्रदीप गाढवे,सहसचिव पंकज घोलप,खजिनदार रघुनाथ तांबे,अमोल डुंबरे,संजय वलव्हणकर,महेंद्र पानसरे, प्रतिक अकोलकर,भगवंता घोडे,सागर दाते,दशरथ भाईक,संतोष सोनवणे, लक्ष्मण दुडे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद खेत्री व प्रास्तविक अमित झरेकर यांनी केले. आभार अनिल जवरे यांनी मानले.

## म्हसरूळ परिसरात तरुणावर शस्त्राने हल्ला; चौघांवर गुन्हा दाखल!



नाशिक (स. गांवकरी) : म्हसरूळ पोलीस ठाणे हद्दीतील दिंडोरी रोडवरील मधुर स्वीट परिसरात २० सप्टेंबर रोजी मागील भांडणाची कुरापत काढून तुषार दीपक इंगळे याच्यावर शस्त्राने हल्ला करण्यात आला. या घटनेत तुषारच्या डोक्याला व हाताला दुखापत झाली. याप्रकरणी आर्यन मोगरे, साई कुटे व त्यांच्या दोन साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेची दखल घेत वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल डहाके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अमोल मस्के, पोलीस उपनिरीक्षक दीपक पठारे, पोलीस जगताप व कर्मचाऱ्यांनी कारवाई करत आरोपी अनिकेत पवार याला अटक केली. नागरिकांमध्ये निर्माण झालेली भीती व दहशत कमी करण्यासाठी आरोपीला घटनास्थळाच्या परिसरातून पोलिसांनी फिरविले. नाशिक शहरातील वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर दहशत निर्माण करणाऱ्या गुन्हेगारांविरोधात पोलिसांकडून कारवाईचा धडाका सुरू असून, या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्याचा पोलिसांचा प्रयत्न आहे.

## तांत्रिक निकष न पाहता अक्कलकोट, दक्षिण सोलापूरला दुष्काळ जाहीर करावे !



अक्कलकोट (स. गांवकरी) : केंद्र शासनाच्या दुष्काळ संहितेनुसार दुष्काळ जाहीर करण्यासाठी पावसातील खंडाचा ठराविक निकष आहे. अक्कलकोट आणि दक्षिण सोलापूर तालुक्यांत सलग २० दिवस पाऊस झाला नाही. त्यानंतर केवळ २.५ मिलिमीटर पाऊस झाला आणि पुन्हा सुमारे २० दिवस पावसाचा खंड पडला आहे. त्यामुळे तांत्रिक निकषांमध्ये काही अडचण येत असली, तरी केवळ कागदावरील निकष न पाहता दोन्ही तालुक्यांतील प्रत्यक्ष परिस्थितीचा विचार करणे गरजेचे आहे. याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेबांची भेट घेऊन निवेदन दिले. अल्प पर्जन्यमान, दीर्घकाळचा पावसाचा खंड, खालावलेली भूजल पातळी तसेच कोरडे पडलेले तलाव आणि जलसाठे यामुळे अक्कलकोट व दक्षिण सोलापूर तालुक्यांतील शेतकरी आणि नागरिकांसमोर गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे तांत्रिक निकषांचा विचार न करता दोन्ही तालुके विशेष बाब म्हणून दुष्काळग्रस्त जाहीर करावेत, अशी आग्रही मागणी मुख्यमंत्री महोदयांकडे केली. प्रत्यक्ष परिस्थितीचा सर्वंकष विचार करून शेतकरी आणि नागरिकांना दुष्काळी उपाययोजनांचा लाभ मिळावा, यासाठी सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंती आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांनी केली.

## महेश मालक इंगळे यांनी मित्रपरिवारासह घेतले चिंतामणीचे दर्शन



अक्कलकोट (स. गांवकरी) : अष्टविनायकांपैकी एक असलेल्या थेऊर येथील श्री चिंतामणी गणपतीचे दर्शन श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश मालक इंगळे यांनी आपल्या मित्रपरिवारासह घेतले. यावेळी त्यांच्या समवेत स्थानिक मान्यवर व मित्रपरिवार उपस्थित होता. यावेळी चिंतामणी गणपती मंदिर समितीच्या वतीने चेअरमन महेश मालक इंगळे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना चेअरमन महेश इंगळे म्हणाले की बाप्पाच्या दर्शनाने मनाला एक वेगळीच शांतता मिळते. थेऊरचा चिंतामणी हा चिंता दूर करणारा आहे. अक्कलकोट स्वामींची सेवा करत असताना बाप्पाचा आशीर्वाद पाठीशी असणे हे आमचे भाग्य आहे. स्वामी आणि बाप्पा दोघांचाही आशीर्वाद आमच्या सर्व सेवाकार्याला मिळत राहो हीच प्रार्थना असल्याचे मनोगत व्यक्त केले. चिंतामणी गणपतीचे मनोभावे दर्शन घेऊन त्यांनी सर्व भाविकांच्या सुख-समृद्धी आणि अक्कलकोट देवस्थानच्या उत्तरोत्तर प्रगतीसाठी प्रार्थना केली. त्यांच्या या दौऱ्यामुळे पुणे परिसरातील भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण होते.

# राष्ट्रीय सेवा योजना व्यक्ति मत्व विकासाचे व्यासपीठ

**प्रा. डॉ. वसंत गावडे**

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)



रोजी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे,अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय,ओतूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना दिन उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाधिकारी डॉ. राजेंद्र आंबवणे व प्राचार्य डॉ. रमेश शिरसाट यांनी दिली. या निमित्ताने राष्ट्रीय सेवा योजनेची भूमिका,उद्दिष्टे व विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासातील योगदान यावर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राजेंद्र आंबवणे यांनी केले. आपल्या प्रास्ताविकातून त्यांनी राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा करण्यामागील हेतू, उद्दिष्टे आणि महत्त्व स्पष्ट केले. कार्यक्रमाचे व्याख्याते प्रा. डॉ.वसंत गावडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनकरताना "राष्ट्रीय सेवा योजना ही केवळ सामाजिक उपक्रमराबविणारी संस्था नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासा ची प्रक्रिया असल्याचे सांगितले.एनएसएसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समाजाशी जोडले जाते आणि प्रत्यक्ष सामाजिक कार्यातून त्यांच्यामध्ये संवेदनशीलता, नेतृत्वगुण,जबाबदारीची भावना आणि सामाजिक जाणीव विकसित होते, असे त्यांनी स्पष्ट केले. "Not Me But You" या बोधवाक्यात राष्ट्रीय सेवा योजनेचा मूलभूत विचार सामावलेला आहे. स्वतःच्या हितापेक्षा समाजहिताला प्राधान्य देऊन इतरांसाठी कार्य करणे, हीच खरी राष्ट्रीय सेवा आहे. युवकां मध्ये सकारात्मक विचार, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्राच्या विकासासाठी योग दान देण्याची भावना निर्माण करण्यामध्ये एनएसएसची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी नमूद केले. राष्ट्रीय सेवा योजनेची सुरुवात २४ सप्टेंबर १९६९ रोजी झाली असून, त्यामागे विद्यार्थ्यांनासमाजाशी जोडून त्यांच्यामध्ये समाज सेवा आणि राष्ट्रसेवेची भावना विकसित करणे, हा मूलभूत विचार आहे.विद्यार्थ्यांचा विकास हा समाजाच्या विकासाशी जोडलेला असून, समाजासाठी केलेल्या कार्यातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो, असेही त्यांनी स्पष्ट केले. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य डॉ. के. डी. सोनावणे यांनी अध्यक्ष मनोगत व्यक्तकरताना विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. समाजाकडे संवेदनशील दृष्टिकोनातून पाहणे आणि सामाजिक प्रश्नांच्या निराकरणासाठी योगदान देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.समाजाच्या विकासासाठी कार्य करताना व्यक्तीचाही विकास होत असतो,त्यामुळे विद्यार्थ्यांनी एनएसएसच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रमां मध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी राजेश रसाळ, निलेश काळे,रमेश गोपाळे, रोहिणी मदने यांच्यासह महाविद्याल यातील प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनायक कुंडलिक यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुवर्णा डुंबरे यांनी केले.

# उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे काटेकोर पालन करा

ठाणे : (स. गांवकरी)



- गणेशोत्सव मंडळे आणि स्वयंसेवी संस्थांना आवाहन

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरेतील महत्त्वाचा उत्सव असून, उत्सवाच्या काळात पर्यावरणाचे संरक्षण आणि जलस्रोतांचे प्रदूषण रोखणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. या पार्श्वभूमीवर गणेशमूर्ती विसर्जनाबाबत मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन ठाणे महानगरपालिकेने नागरिकांना केले आहे. गणेशमूर्ती विसर्जनाच्या अनुषंगाने मा. मुंबई उच्च न्यायालयाने 20 ऑगस्ट 2026 रोजी दिलेल्या निर्देशांनुसार, तसेच गतवर्षीच्या 24 जुलै 2025 रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने ठाणे महानगरपालिकेने पर्यावरणपूरक विसर्जनाची व्यवस्था केली आहे. उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार, 6 फूट उंचीपर्यंतच्या गणेशमूर्तींचे विसर्जन केवळ कृत्रिम विसर्जन तलाव अथवा कृत्रिम जलसाठ्यामध्ये करणे बंधनकारक आहे. तर 6 फुटांपेक्षा अधिक उंचीच्या गणेशमूर्तींच्या विसर्जनाबाबत लागू असलेल्या निर्देशांनुसार नैसर्गिक जलस्रोतांमध्ये विसर्जन करण्यास परवानगी आहे.

गणेशभक्तांच्या सुविधेसाठी ठाणे महानगरपालिकेने शहरातील विविध ठिकाणी कृत्रिम विसर्जन तलाव, मूर्ती संकलन व्यवस्था आणि निर्माल्य संकलन केंद्रे उपलब्ध करून दिली आहेत.

# आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्सचा महाराष्ट्रात विस्तार

जेजुरी : (स. गांवकरी)



- जेजुरी येथे नवीन शाखा सुरू
- लॉन्च ऑफर : शून्य लॉगिन फी आणि 50 लाख रूपयांपर्यंत तात्काळ कर्ज मंजुरी

आदित्य बिर्ला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड ("एबीएचएफएल") या आघाडीच्या हाऊसिंग फायनान्स कंपनी आणि आदित्य बिर्ला कॅपिटल लिमिटेडच्या उपकंपनीने महाराष्ट्रातील आपला विस्तार वाढवत जेजुरी येथे नवीन शाखा सुरू केली आहे. देशभरातील शाखांचे नेटवर्क वाढवण्याच्या व्यापक योजनेअंतर्गत ही शाखा सुरू करण्यात आली आहे. या नवीन शाखेमुळे महाराष्ट्रातील एबीएचएफएलच्या शाखांची एकूण संख्या 43 झाली आहे. यामुळे वेगाने वाढणाऱ्या बाजारपेठांमध्ये कंपनीची उपस्थिती मजबूत होऊन ग्राहकांना अधिक सहजपणे सेवा उपलब्ध होणार आहे. जेजुरीच्या गृहनिर्माण बाजारपेठेत सातत्याने वाढ होत आहे. पुणे जिल्ह्यातील महत्त्वाचे स्थान, पुणे–सोलापूर औद्योगिक मार्गिका आणि पुणे–सोलापूर महामार्गामुळे सुधारलेली रस्ते कनेक्टिव्हिटी यामुळे या वाढीला चालना मिळत आहे. जेजुरी आणि आसपासच्या भागात घरांची मागणी वाढत आहे. औद्योगिक क्षेत्रातील कर्मचारी, नोकरी करणारे व्यावसायिक, स्थानिक व्यवसायिक तसेच रोजगाराच्या संधी आणि आवश्यक सुविधा जवळ असलेले तुलनेने परवडणारे घर शोधणाऱ्या कुटुंबांकडून ही मागणी वाढत आहे.

# मांडव व आधुनिक संरचना तंत्रातून भाजीपाला शेतीला नवी दिशा

**ग्रामीण महिलांना कृषी व्यवसायाचे शास्त्रीय प्रशिक्षण**

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)



ग्रामीण महिलांना शेतीच्या माध्यमातून शाश्वत व नियमित उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी तसेच कमी क्षेत्रात अधिक उत्पादन घेण्या च्या उद्देशाने NISD (राष्ट्रीय स्थायी विकास संस्था) व AFARM, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण महिला उप जीविका सक्षमीकरण प्रकल्प फेज-II अंतर्गत 'फिरता निधी महिला उद्योजिका कौशल्य आधारित पायाभूत प्रशिक्षण कृषी व्यवसाय' उपक्रमांतर्गत भाजीपाला लागवडीचे प्रशिक्षण घेण्यात येत असून यामुळे मांडव व आधुनिक संरचना तंत्रातून भाजीपाला शेतीला नवी दिशा मिळते असे मत कृषी प्रशिक्षक रविंद्र भोर यांनी व्यक्त केले.

ओतूर क्लस्टरमधील खामुंडी,डुंबरवाडी,पिंपरीपेंढार उंब्रज ठिकेकरवाडी परिसरा तील गावांमध्ये विविध टप्प्यां मध्ये हे प्रशिक्षण राबविण्यात येत असून,ग्रामीण महिला शेतकऱ्यांना आधुनिक व शास्त्रीय पद्धतीने भाजीपाला उत्पादन घेण्याबाबतमार्गदर्शन केले जात आहे.या प्रशिक्षणा मध्ये घेवडा,कारले,भोपळा व वालवड या वेलवर्गीय पिकांची मांडव पद्धतीने,तर टोमॅटो व वांग्याची आधुनिक संरचना व स्टेकिंग तंत्राने लागवड करण्याचे तंत्र शिकविण्यात येत आहे.मांडवासाठी खांब, तार व दोरीचा योग्य वापर, वेलांची बांधणी, झाडांची वाढ योग्य दिशेने करण्याचे तंत्र तसेच पिकांच्या वाढीनुसार आवश्यक व्यवस्थापनाचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सहभागी महिलांना देण्यात येत आहे.

प्रशिक्षणादरम्यान सुधारित वाणांची निवड,दर्जेदार बियाणे, योग्य लागवड अंतर, रोपवाटिका व्यवस्थापन, ठिबक सिंचन, पाणी व खत व्यवस्थापन, सेंद्रिय निविष्ठांचा वापर,एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन, तण नियंत्रण तसेच उत्पादनाची बाजारपेठ या महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन करण्यात येत आहे. मांडव व आधुनिक संरचना तंत्रामुळे पिकांची वाढ व्यवस्थित होण्यास मदत होते. पिकांना हवा व सूर्यप्रकाश मिळतो,फळे जमिनीच्या संपर्कात येण्याचे प्रमाण कमी होते तसेच कीड-रोगांचे निरीक्षण,फळांची तोडणी आणि पीक व्यवस्थापन अधिक सुलभ होते. उपलब्ध क्षेत्राचा कार्यक्षम वापर करून दर्जेदार उत्पादन घेण्यास या तंत्राची मदत होते.प्रशिक्षण केवळ सैद्धांतिक स्वरूपाचे न ठेवता मांडव उभारणी, खांब- तार-दोरीचा वापर, वेलांची बांधणी तसेच टोमॅटो व वांग्याच्या झाडांची संरचना करण्याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक देण्यात येत आहे. त्यामुळे सहभागी महिला शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान प्रत्यक्ष कृतीतून आत्मसात करण्याची संधी मिळत आहे.या उपक्रमा मुळे ग्रामीण महिलांमध्ये आधुनिक शेती तंत्रज्ञानाबाबत जागरूकता वाढत असून, शेतीला व्यवसायाची दिशा देत उत्पन्नवाढीचे नवे मार्ग निर्माण करण्यासाठी महिलांना प्रोत्साहन मिळत आहे.

# किडनी दान करून पत्नीने पतीला दिले नवजीवन

**अर्चना वाळुंज यांच्या त्यागाची परिसरात चर्चा**

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)



दोन्ही किडन्या निकामी झाल्याने सहा महिन्यांहून अधिक काळ डायलिसिसवर असलेल्या वडगाव आनंद ता:- जुन्नर येथील किशोर गहिनाजी वाळुंज यांच्यावर पुणे येथील इनलॅक्स बुधराणी हॉस्पिटलमध्ये किडनी प्रत्या रोपणाची शस्त्रक्रिया करण्यात आली. त्यांच्या पत्नी अर्चना वाळुंज यांनी स्वतःची किडनी पतीला दान करून त्यांना नव जीवनाची संधी दिली. प्रत्यारोपणानंतर पती-पत्नी दोघांचीही प्रकृती स्थिर असून ते सुखरूप आहेत. किशोर वाळुंज यांना किडनीच्या आजाराचे निदान झाल्यानंतर मंचर येथील सार्थक हॉस्पिटलमधील नेफ्रॉलॉजिस्ट डॉ.प्रितम गाडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपचार सुरू करण्यात आले. सुरुवातीला कॅथेटरद्वारे डायलिसिस करण्यात आले. त्यानंतर नियमित डायलिसिस सुरू ठेवावे लागले. पुढील उपचारांसाठी नवी मुंबई येथील विनम्र स्वराज हॉस्पीटलचे डॉ.चौधरी यांचाही सल्ला घेण्यात आला. उपचारा दरम्यान फिस्टुला निकामी झाल्याने उपचार प्रक्रियेत अडचणी निर्माण झाल्या.तपासण्यांमध्ये दोन्ही किडन्या निकामी झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर डॉक्टरांनी किडनी प्रत्यारोपणाचा सल्ला दिला. त्यानुसार दात्याचा शोध सुरू असतानाच अर्चना वाळुंज यांनी स्वतःची किडनी पतीला देण्याची तयारी दर्शविली.आवश्यक वैद्यकीय तपासण्या,रक्तगट जुळवणी आणि कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किडनी प्रत्यारोप णाची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली.

या उपचारांसाठी मोठ्या आर्थिक खर्चाची आवश्यकता होती. या काळात वसंतराव नाईक नागरी सह पतसंस्था वडगाव आनंदचे चेअरमन नेताजीदादा डोके,व्हाईस चेअरमन राजूशेठ चौगुले, संचालक मंडळ,मुख्य कार्यकारी अधिकारी दिनकर देवकर यांच्यासह उद्योजक, मित्रपरिवार,नातेवाईक,विविध संस्था आणि अर्चना वाळुंज यांच्या २००१ सालच्या दहावी च्या बॅचने आर्थिक मदतीचा हात पुढे केला.उपचाराच्या संपूर्ण प्रक्रियेत अवयव प्रत्या रोपण समन्वयक ज्योती शिळमकर,डॉ. भूपेश कवारे, डॉ. अनुराग अवस्थी तसेच उद्योजक पुनीत बालन, राजू शेठ पायमोडे,विनोदशेठ गांधी गोविंद वाढवणे,शांता कदम, राजेंद्र वाळुंज,विशाल देवकर, गोरक्ष देवकर,डॉ.योगेश कुटे यांच्यासह अनेकांनी सहकार्य केले.

# नगरसेविका शालन शिंदे यांच्या मुलासह तिघांचा जामीन अर्ज फेटाळला

सोलापूर : (स. गांवकरी)



राजकीय वैमनस्यातून झालेल्या बाळासाहेब सरवदे खून प्रकरणातील आरोपी अनिल शंकर शिंदे, महेश शिवाजी भोसले आणि रोहित राजू सरवदे यांच्या जामीन अर्जावर सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालयात सुनावणी झाली. सरकारी पक्षाने केलेला युक्तिवाद ग्राह्य धरत मा. श्रीमती आर. एम. शिंदे, जिल्हा व सत्र न्यायाधीश, सोलापूर यांनी तिन्ही आरोपींचे जामीन अर्ज फेटाळून लावले. या प्रकरणात २ जानेवारी २०२६ रोजी अपक्ष उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या कारणावरून वाद झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे. त्यानंतर झालेल्या हाणामारीत बाळासाहेब सरवदे यांच्यावर तलवारीने छातीवर वार करण्यात आल्याचा आरोप आहे. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. तसेच फिर्यादी आणि साक्षीदारांनाही मारहाण करून जखमी केल्याचे तक्रारीत नमूद आहे. जामीन अर्जास विरोध करताना जिल्हा सरकारी वकील डॉ. प्रदीपसिंग मो. राजपूत यांनी गुन्ह्याचे स्वरूप गंभीर असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. आरोपींनी गुन्ह्यात वापरलेली हत्यारे काढून दिली असून, प्रकरणात दहा नेत्रसाक्षीदार, वैद्यकीय पुरावा आणि परिस्थितीजन्य पुरावा असल्याचा युक्तिवाद त्यांनी केला. आरोपींना जामीन मिळाल्यास सरकारी साक्षीदारांवर दबाव आणण्याची शक्यता असल्याचेही त्यांनी सांगितले. सरकारी पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरत .न्यायालयाने अनिल शंकर शिंदे, महेश शिवाजी भोसले आणि रोहित राजू सरवदे यांचे जामीन अर्ज फेटाळून लावले.

# सोलापुरात दरोड्याचा मोठा कट उधळला!

- दरोडेखोरांच्या आंतरराज्य टोळीला अटक
- पिस्तूल, जिवंत काडतुसे व प्राणघातक शस्त्रांसह ७ सराईत दरोडेखोरांना अटक
- १०.२९ लाखांचा मुद्देमाल जप्त

सोलापूर : (स. गांवकरी)



गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहरात मध्यरात्री दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या एका आंतरराज्यीय टोळीचा सोलापूर शहर गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे . मुळेगाव रोड परिसरातील अमर ज्योती नगरमध्ये धाड टाकून पोलिसांनी ७ सराईत गुन्हेगारांना शिताफीने जेरबंद केले. त्यांच्याकडून १ देशी बनावटीचे पिस्तूल, ५ जिवंत राऊंड , २ तलवारी, ३ खंजीर, महिंद्रा XUV 500 कार आणि १ मोटारसायकलसह एकूण १० लाख २९ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सोलापूर शहर पोलीस आयुक्त एम . राजकुमार यांनी शहरातील मालमत्ताविषयक गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी विशेष सूचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने २० सप्टेंबर २०२६ रोजी रात्री एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना, सपोनि भरत चंदनशिव व पोलीस अंमलदार अमोल यादव (ब.नं. १६६४) यांना खात्रीशीर बातमी मिळाली की, काही संशयित इसम प्राणघातक शस्त्रांसह काळ्या रंगाच्या चारचाकी व मोटारसायकलसह अमर ज्योती नगर (प्लॉट नं. ८३, नरसिंग नगर शेजारी, मुळेगाव रोड) येथे दरोडा टाकण्यासाठी जमा झाले आहेत.

या माहितीच्या आधारे गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने व सहाय्यक पोलीस आयुक्त दिलीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि भरत चंदनशिव, सपोनि निलेश सोनवणे, पोउपनि विजय बनसुडे, पोउपनि मनोज मोरे व त्यांच्या पथकाने घटनास्थळी पोहोचून संशयितांना चहूबाजूंनी घेराव घातला आणि ताब्यात घेतले.

अटक करण्यात आलेले ७ सराईत आरोपी १. मनदीपसिंग दयासिंग संधू (वय ४३, व्यवसाय: मजुरी, रा. गुरुद्वारा लंगर साहिब, नगीना घाट, नांदेड) २. बलप्रीतसिंग सतनामसिंग खैरा (वय २५, व्यवसाय: मजुरी, रा. खैरा निवास, बडपुरा, गुरुद्वारा गेट नं. ४, नांदेड) ३. अंकुर राजकुमार प्रताप सिंह (वय २८, व्यवसाय: मजुरी, रा. तारवा, ता. अरप, जि. पाटणा, बिहार)

४ . लक्ष्मण नामदेव जगताप (वय ३५, व्यवसाय: मजुरी, रा. म्हसोबा मंदिराजवळ, जगताप वस्ती, भागगाव, जि. औरंगाबाद/छत्रपती संभाजीनगर) ५. सुखदेवसिंग बलविंदरसिंग गिल (वय ४२, व्यवसाय: मिस्त्री, रा. वैरोवाल, खडूर साहिब, जि. तरनतारन, पंजाब) ६. दिलीपसिंग हरीसिंग पवार खालसा (वय ३४, व्यवसाय: मजुरी, रा. ब्रम्हसिंग नगर, तरोडा बु., नांदेड)

७. राजेश कन्नीराम राठोड (वय ४४, व्यवसाय: मजुरी, रा. घर नं. १४, नरसिंग नगर, मुळेगाव रोड, सोलापूर) १० लाख २९ हजारांचा मुद्देमाल व शस्त्रसाठा जप्त

अग्निशस्त्रे व शस्त्रे: १ देशी बनावटीचे पिस्तूल, ५ जिवंत राऊंड (आरोपी अंकुर सिंह याच्याकडून जप्त), २ तलवारी, ३ खंजीर.

दरोड्याचे साहित्य: २ कटावणी, १ छन्नी, १ लांब दोरखंड, ३ जोडी हॅन्डग्लोव्ज, २ नंबर प्लेट, १ कलर स्प्रे बॉटल, ७ मोबाईल.

वाहने: १ काळ्या रंगाची महिंद्रा XUV 500 कार (क्र. MH 12 HB 7700) व १ यामाहा मोटारसायकल (क्र. TG 07 AJ 6467).

# एचडीएफसी अर्गो आयोजित 11 व्या इन्श्युरन्स क्विझ ज्युनियरची सांगता

## 600 हून अधिक जिल्ह्यातील 16,900 हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग

पुणे : (स. गांवकरी)

एचडीएफसी अर्गो जनरल इन्श्युरन्स या भारतातील आघाडीच्या सर्वसाधारण विमा क्षेत्रातील कंपनी तर्फे त्यांच्या इन्श्युरन्स क्विझ ज्युनियर २०२६ च्या ११ व्या पर्वाचे यशस्वी आयोजन केले होते, भारतातील मुलांमध्ये वित्तीय साक्षरता वाढीस लागावी या हेतूने या महत्त्वपूर्ण अशा स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. या वर्षी या उपक्रमा मध्ये १,१०० हून अधिक शहरांतील तसेच देशभरांतील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतून आलेले १६,९०० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. ज्यायोगे हा कार्यक्रम देशभरांतील विम्याची जागरुकता निर्माण करणाऱ्या उपक्रमांसह सर्वांत मोठी पोहोच असलेल्या शालेय उपक्रमांपैकी एक ठरला आहे. एचडीएफसी अर्गो तर्फे देशभरात विम्याचा प्रसार वाढीस लागावा या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन केले जात असून दि इन्श्युरन्स क्विझ ज्युनियर च्या माध्यमातून पुढील पिढीत लहान वयापासूनच विम्याचा प्रसार करण्यावर लक्ष केंद्रित केले जात असून एकूणच शाळेतील ८ व ९ वीत शिकणाऱ्या देशभरांतील शाळांमध्ये हा उपक्रम सुरु करण्यात येत आहे. या उपक्रमाची सुरुवात ही २०१६ मध्ये केवळ एक शहर आणि १८ शाळांपासून करण्यात आली आणि आजमितीस एका दशकाच्या कालावधीत ३ दशलक्ष विद्यार्थ्यांपर्यंत पोहोच निर्माण झाल्याने देशभरांतील जवळजवळ तीन चतुर्थांश जिल्ह्यांमध्ये ही पोहोच निर्माण झाली आहे. हा क्विझ म्हणजे भारत हा वित्तीय दृष्ट्या सुशिक्षित होऊन लहान वयात मुलांना ज्ञान आणि आत्मविश्वास देऊन ते भविष्यासाठी योग्य निर्णय घेण्यास सक्षम करण्यावर कंपनीच्या योजनेचा एक भाग आहे. अतिशय अटीतटीच्या अशा या अंतिम सामन्यात मध्यप्रदेशातील भेल येथील जवाहरलाल नेहरु स्कूल च्या मेधांश देवळे आणि तन्वी शुक्ला यांनी या वर्षीचा पुरस्कार जिंकला. तसेच त्यांच्याशी अगदी अटीतटीच्या सामन्यात केरळच्या भवन्स विद्यामंदीर चे डिलियन डॉन आणि प्रणव संतोष हे पहिले तर महाराष्ट्रातील कल्याणी स्कूल चे आलिशा जैन आणि आयुष झा हे दुसरे उपविजेते ठरले.






दिवा (ठाणे) : दिवा पूर्वेतील बेडेकर नगर परिसरातील ओम साई अपार्टमेंट, इमारत क्रमांक ८ मध्ये गुरुवारी पहाटे धक्कादायक घटना घडली. विजय शुक्ला (वय ३४) यांचा मृत्यू झाला असून कोमल साळुंखे या अत्यवस्थ असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## थोडक्यात बातम्या...




### २ ऑक्टोबरला 'पूजा मेरी जान'चा प्रीमियर

मुंबई (स. गांवकरी) : मॅडॉक फिल्म्स निर्मित आणि नवज्योत गुलाटी दिग्दर्शित 'पूजा मेरी जान' या बहुपदरी नाट्यमय चित्रपटाचा प्रीमियर २ ऑक्टोबर २०२६ रोजी झी५ वर होणार आहे. दिनेश विजन आणि अमर कौशिक निर्मित या चित्रपटात मृणाल ठाकूर, हुमा कुरेशी, विक्रम सिंग चौहान आणि विजय राज यांच्या प्रमुख भूमिका आहेत. पूजा या तरुणीभोवती फिरणाऱ्या या कथेत प्रेम, नकार, संमती, वेड आणि सामाजिक दृष्टिकोन यांसारख्या विषयांचा वेध घेण्यात आला आहे. जवळच्या मित्राचे प्रेम नाकारल्यानंतर घडणाऱ्या अस्वस्थ घटनांमुळे कथेला रहस्यमय वळण मिळते. हुमा कुरेशीने साकारलेली सना ही कायदेशीर दृष्टिकोनातून प्रकरणाचा शोध घेत सत्य उलगडण्याचा प्रयत्न करते. प्रेक्षकांना सोपी उत्तरे न देता विविध प्रश्न विचारण्यास भाग पाडणारी ही कथा असल्याचे कलाकारांनी सांगितले.

### गणेशोत्सवासोबत फेस्टिव्ह फॅशनचा उत्साह; Nykaa Fashion वर नवे ट्रेंड

पुणे (स. गांवकरी) : गणेश चतुर्थीच्या आगमनासोबतच फेस्टिव्ह सीझनला सुरुवात झाली असून, यंदा पारंपरिक आणि मॉडर्न फॅशनचा सुंदर मिलाफ पाहायला मिळत आहे. Nykaa Fashion वर आकर्षक कुर्ता सेट्स, अनारकली, मॉडर्न को-ऑर्ड सेट्स आणि साड्यांचे विविध पर्याय उपलब्ध आहेत. गुलाबी, नारंगी आणि हिरव्या रंगांपासून एम्ब्रॉयडरी, मिरर वर्क आणि झरी डिटेलिंगपर्यंत, यंदाच्या कलेक्शनमध्ये फेस्टिव्ह लूकला आधुनिक टच देण्यात आला आहे. KALKI, Aadveka, Vaamsi, Odette आणि Shop Gulmohar यांसारख्या ब्रँड्सचे स्टाइलिश पर्याय विविध सेलिब्रेशनसाठी योग्य ठरतात. गणपती दर्शन असो, कौटुंबिक सोहळा किंवा मित्रांसोबतची पार्टी—प्रत्येक फेस्टिव्ह क्षणासाठी परफेक्ट स्टाइल, फक्त Nykaa Fashion

### मिरे ॲसेट शेअरखानची एएसके प्रायव्हेट वेल्थसोबत धोरणात्मक भागीदारी

मुंबई (स. गांवकरी) : मिरे ॲसेट शेअरखानने नव्याने सुरू केलेल्या 'प्रीमियर वेल्थ पार्टनर' श्रेणीअंतर्गत एएसके प्रायव्हेट वेल्थला अधिकृत व्यावसायिक भागीदार म्हणून सहभागी करून घेतले आहे. या धोरणात्मक भागीदारीद्वारे दोन्ही संस्था आपल्या विशेष तज्ज्ञतेचा आणि क्षमतांचा समन्वय साधून ग्राहकांना अधिक सक्षम, सुलभ आणि अखंड गुंतवणूक अनुभव देण्यावर भर देणार आहेत. एएसके प्रायव्हेट वेल्थ ही मिरे ॲसेट शेअरखानच्या नव्या 'प्रीमियर वेल्थ पार्टनर' उपक्रमातील पहिली भागीदार संस्था ठरली आहे. या उपक्रमाद्वारे भारतातील अग्रगण्य वेल्थ मॅनेजर्स आणि वित्तीय संस्थांसोबत दीर्घकालीन भागीदारी विकसित करण्याचे मिरे ॲसेट शेअरखानचे उद्दिष्ट आहे. सध्या वित्तीय सेवा क्षेत्रात ग्राहकांच्या अपेक्षांमध्ये मोठे बदल होत आहेत. विश्वासार्ह सल्ला, सुरळीत अंमलबजावणी, डिजिटल सुविधा, कार्यक्षम सेवा आणि संपत्ती निर्मितीच्या प्रवासात सर्वसमावेशक मदत यांचा एकत्रित अनुभव ग्राहकांना अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर ही भागीदारी महत्त्वाची ठरते. एएसके प्रायव्हेट वेल्थची उच्च-निव्वळ-मूल्य असलेल्या ग्राहकांना वेल्थ मॅनेजमेंट आणि सल्ला देण्याची तज्ज्ञता मिरे ॲसेट शेअरखानच्या ब्रोकिंग प्लॅटफॉर्म, तंत्रज्ञान, संशोधन क्षमता आणि कार्यक्षम अंमलबजावणी व्यवस्थेशी जोडली जाणार आहे.

### पॉलिसीबाजार वर 'कोटक प्रोटेक्ट ॲडव्हांटेज' हे टर्म इन्शुरन्स सोल्यूशन

मुंबई (स. गांवकरी) : कोटक महिंद्रा लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड ("कोटक लाइफ") आणि पॉलिसीबाजारने कोटक प्रोटेक्ट ॲडव्हांटेज लाँच करण्याची घोषणा केली आहे. हा एक लवचिक आणि सर्वसमावेशक टर्म इन्शुरन्स प्लॅन आहे जो लोकांना त्यांच्या कुटुंबाचे आर्थिक भविष्य सुरक्षित करण्यास मदत करतो. यामध्ये मोठे लाइफ कव्हर आणि ग्राहकांसाठी उपयुक्त अशी अनेक फीचर्स दिली आहेत जी आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर उपयोगाला येतील. कोटक लाइफचे उपव्यवस्थापकीय संचालक अमित पाल्टा म्हणाले, "लाइफ इन्शुरन्सचे भविष्य विशिष्ट ग्राहक गटांसाठी सुसंगत सोल्यूशन्स देण्यावर अवलंबून आहे. कोटक लाइफमध्ये आम्ही ग्राहकांच्या गरजा, आवडी आणि आर्थिक प्राधान्ये समजून घेण्यासाठी आमच्या पार्टनर्ससोबत काम करतो आणि त्यातून मिळालेल्या माहितीचा उपयोग अर्थपूर्ण उत्पादन नवनिर्मितीसाठी करतो. कोटक प्रोटेक्ट ॲडव्हांटेज हे आजच्या तरुण आणि डिजिटली साक्षर ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आले आहे." पॉलिसीबाजारचे चीफ बिझनेस ऑफिसर विवेक जैन म्हणाले, "टर्म इन्शुरन्सने व्यक्तीच्या वास्तव आयुष्यातील गरजांशी सुसंगत राहणे गरजेचे आहे. व्यक्ती जशी आयुष्याच्या विविध टप्प्यातून जाते, तशी तिची आर्थिक जबाबदारी आणि संरक्षणाची गरजही बदलणे आवश्यक असते. कोटक लाइफसोबत कोटक प्रोटेक्ट ॲडव्हांटेज पॉलिसीबाजार प्लॅटफॉर्मवर आणताना आम्हाला आनंद होत आहे, जे ग्राहकाच्या प्रवासातील विविध टप्प्यांवर उपयुक्त वैशिष्ट्ये प्रदान करते. हा प्लॅन मेडिकल टेस्टशिवाय कव्हर वाढवण्याची सोय, प्रीमियम ब्रेक घेण्याची सुविधा, क्लेमची माहिती देताच ₹2 लाखांचे इन्स्टंट पेआउट आणि आरोग्य व वेलबीइंगचे फायदे मिळवण्याची संधी देतो. यामुळे हा प्लॅन ग्राहकांच्या बदलत्या गरजांसाठी खूपच उपयुक्त ठरतो."

# कळवण तहसील कार्यालयात सेवा संकल्प अभियान

## प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना व SMART योजनेबाबत योगेश जेगदाळे यांनी नागरिकांना मार्गदर्शन केले

कळवण : (स. गांवकरी)

महावितरणच्या वतीने कळवण तहसील कार्यालय येथे'सेवा संकल्पअभियान' अंतर्गत किऑस्कचे आयोजन करण्यात आले याअभियानाला कळवण प्रकल्प अधिकारी तथा उपविभागीय प्रांताधिकारी कश्मीरा संखेआणि तहसीलदार रोहिदास वारुळे यांनी भेट देऊन उपक्रमाची पाहणी केली.

यावेळी महावितरणचे कार्यकारी अभियंता अमोल मोरे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता छगनथैल,उपकार्यकारी अभियंता योगेश जगदाळे यांच्यासह कळवण विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सौरऊर्जा योजनांची सविस्तर माहिती अभियानादरम्यान उपस्थित नागरिकांना प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना, स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप योजना (SMART) तसेच महावितरणच्या इतर योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यातआले.



उपकार्यकारीअभियंता योगेश जगदाळे आणि राणी काळे,कळवण उपविभाग यांच्या माध्यमातून सौरऊर्जा योजनांची माहिती देण्यात आली. या योजनांद्वारे नागरिकांनाअनुदानित सौरऊर्जा सुविधांचा लाभ घेण्याची संधी उपलब्धअसून घरगुती वीज वापरासाठी रूफटॉप सोलर योजनेचे महत्त्व नागरिकांना समजावून सांगण्यात आले.अधिकारी, कर्मचारी व एजन्सी प्रतिनिधींची उपस्थिती

कार्यक्रमासाठी सहाय्यक लेखापाल राहुल जोशी,रवी नागरे, गजानन पगार, पुष्पराज भोये तसेच आदित्य इलेक्ट्रिकल आणि तिरुपती इलेक्ट्रिकल या एजन्सींचे प्रतिनिधी उपस्थित होते.यावेळी नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

सौरऊर्जा योजनांचा लाभ घेण्याचेआवाहन प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना आणि स्वयंपूर्ण महाराष्ट्रआवासीय रूफटॉप योजना (SMART) या अनुदानित सोलर योजनांचा लाभ अधिकाधिक नागरिकांनी घ्यावा, असेआवाहन महावितरणच्या वतीने करण्यातआले. नागरिकांनी उपलब्ध योजनांची माहिती घेऊन पात्रतेनुसार सौरऊर्जा सुविधांचा लाभ घ्यावा,असेही सांगण्यात आले.

# 'अनुगा सिलेक्ट इंडिया' आणि 'अनुगा फूडटेक इंडिया २०२६' चे आयोजन

- ३१ देशांतील १,१०० हून अधिक प्रदर्शक होणार सहभागी

पुणे : (स. गांवकरी)

दर्जेदार उत्पादनांच्या वाढत्या मागणीमुळे भारतातील अन्न, पेय आणि कृषी क्षेत्रात वेगाने बदल होत आहेत. भारताची फूडसर्व्हिस बाजारपेठ २०२५ मधील ८५.१९ अब्ज डॉलर्सवरून २०२६ मध्ये ९३.९७ अब्ज डॉलर्सवर पोहोचण्याचा अंदाज आहे. याच पार्श्वभूमीवर मुंबईतील बॉम्बे एक्झिबिशन सेंटर येथे २९ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर २०२६ दरम्यान 'अनुगा सिलेक्ट इंडिया'ची १९ वी आवृत्ती आणि 'अनुगा फूडटेक इंडिया'च्या २० व्या आवृत्तीचे संयुक्त आयोजन करण्यात येत आहे. कोइलनमेस्से द्वारे आयोजित या तीन दिवसीय जागतिक प्रदर्शनात ३१ देशांतील १,१०० हून अधिक प्रदर्शक आणि देश-विदेशातील ५०,००० हून अधिक व्यावसायिक प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. एकीकडे 'अनुगा सिलेक्ट इंडिया' ॲपग्रीफूड्स, दुग्धजन्य पदार्थ, पेये, फाईन फूड्स आणि सेंद्रिय उत्पादने यांसारख्या प्रमुख क्षेत्रांचे प्रदर्शन करेल, तर दुसरीकडे 'अनुगा फूडटेक इंडिया'च्या माध्यमातून फूड प्रोसेसिंग, ऑटोमेशन, पॅकेजिंग तंत्रज्ञान, अन्न सुरक्षा आणि कोल्ड चेन लॉजिस्टिक्सशी संबंधित अत्याधुनिक तंत्रज्ञान सादर केले जाईल, जे संपूर्ण अन्न मूल्य साखळीला एकाच छताखाली आणेल.

# महावितरणचा 'जनमित्र' आता बालभारतीच्या पाठ्यपुस्तकात!

- इयत्ता तिसरीच्या 'कार्यशिक्षण' पुस्तकात वायरमनचे चित्र
- महाराष्ट्र वीज कामगार महासंघाकडून स्वागत

मुंबई : (स. गांवकरी)

ऊन, वारा, पाऊस यांची तमा न बाळगता अहोरात्र धावपळ करून घराघरात प्रकाश पोहोचविणाऱ्या महावितरणच्या 'जनमित्रा'ला आता बालभारतीच्या पाठ्यपुस्तकात स्थान मिळाले आहे. सन २०२६ च्या इयत्ता तिसरीच्या 'कार्यशिक्षण' विषयाच्या पाठ्यपुस्तकात 'परिसरातील व्यक्ती' या घटकांतर्गत वायरमनचे चित्र समाविष्ट करण्यात आले आहे. या निर्णयाचे महाराष्ट्र वीज कामगार महासंघाच्या वतीने स्वागत करण्यात आले. वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी तसेच वादळ, पाऊस आणि आपत्कालीन परिस्थितीत वीज सेवा पूर्ववत करण्यासाठी महावितरणचे कर्मचारी आणि अभियंते अहोरात्र कार्यरत असतात. अनेकदा प्रतिकूल हवामानातही जीवाची पर्वा न करता ते वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी घटनास्थळी धाव घेतात. त्यांच्या या सेवाभावी कार्याची दखल आता शालेय पाठ्यपुस्तकाच्या माध्यमातून नव्या पिढीपर्यंत पोहोचणार आहे. महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर बालभारतीच्या इयत्ता तिसरीच्या कार्यशिक्षणाच्या पुस्तकात वायरमनचा समावेश करण्यात आला आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या परिसरात वीज सेवा पुरविणारे कर्मचारी, वायरमन यांच्या कार्याची प्राथमिक माहिती मिळणार आहे. त्याचबरोबर विद्युत सुरक्षा, विजेचा योग्य वापर आणि ऊर्जा बचतीबाबत जनजागृती करण्यासही मदत होईल.

महावितरणच्या कर्मचाऱ्यांना 'जनमित्र' म्हणून संबोधले जाते. वादळ असो अथवा मुसळधार पाऊस, वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर नागरिकांच्या तक्रारींना प्रतिसाद देत हे कर्मचारी सेवा बजावत असतात. त्यांच्या या कार्याला शालेय पाठ्यपुस्तकात मिळालेले स्थान हे त्यांच्या निष्ठा, परिश्रम आणि सामाजिक बांधिलकीची दखल असल्याची भावना महाराष्ट्र वीज कामगार महासंघाने व्यक्त केली.

# पडघ्यात पाणीपुरवठ्याचा बोजवारा

- मुख्य जलवाहिनी गळतीमुळे ग्रामस्थ त्रस्त
- नवीन पाणीपुरवठा योजनेला गती देण्याची मागणी
- काही भागांत अद्याप अपुरा पाणीपुरवठा

भिवंडी : (स. गांवकरी)

भिवंडी तालुक्यातील पडघा गावात गेल्या काही दिवसांपासून पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने ग्रामस्थांना पाण्यासाठी मोठी धावपळ करावी लागत आहे. गणेशोत्सवाच्या काळातच पाणीपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत असून, वारंवार उद्भवणाऱ्या या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी होत आहे. पडघा गावाच्या पाणीपुरवठ्यासाठी वापरण्यात येणाऱ्या मुख्य जलवाहिनीमध्ये बिघाड झाल्याने काही दिवस पाणीपुरवठा ठप्प झाला होता. गेल्या सहा महिन्यांपासून जलवाहिनी फुटणे, मोटारमध्ये बिघाड होणे, वीजपुरवठ्याच्या अडचणी तसेच अन्य तांत्रिक कारणांमुळे पाणीपुरवठा वारंवार विस्कळीत होत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. त्यामुळे नियमित पाणीपुरवठ्याऐवजी



अनेकदा नागरिकांना पाण्यासाठी पर्यायी व्यवस्था करावी लागत आहे.

दरम्यान, पडघा गावातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता सध्याची पाणीपुरवठा यंत्रणा अपुरी ठरत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. जुनी मुख्य जलवाहिनी तसेच गावातील अंतर्गत जलवाहिन्यांवर वाढत्या लोकसंख्येचा ताण पडत असल्याने वारंवार गळती आणि बिघाडाच्या समस्या निर्माण होत आहेत. पडघा गावातील पाणीप्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी जलशुद्धीकरण केंद्रासह सुमारे १८ कोटी रुपयांची नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर झाल्याचे सांगण्यात येते. मात्र, या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी कधी होणार, असा प्रश्न ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. नवीन पाणीपुरवठा योजनेअंतर्गत पडघा गावात टाकण्यात येणारी जलवाहिनी नवीन असणार आहे की सध्याची जुनीच जलवाहिनी वापरण्यात येणार आहे, याबाबत माहिती मिळावी, अशी मागणी योगेश जाधव यांनी पडघा ग्रामपंचायतीकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

सध्या दुरुस्तीचे काम पूर्ण करून पाणीपुरवठा सुरू करण्यात आला असला तरी काही भागातील नागरिकांना अद्याप पुरेसा पाणीपुरवठा होत नसल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे तात्पुरत्या दुरुस्तीऐवजी नवीन पाणीपुरवठा योजना लवकरात लवकर कार्यान्वित करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

"मुख्य जलवाहिनीला तीन ठिकाणी गळती झाली होती. त्यापैकी एका ठिकाणी दुरुस्ती करण्यासाठी ब्रेकरची आवश्यकता होती. ब्रेकर उपलब्ध होण्यासाठी एक दिवस लागला, तर उर्वरित दोन ठिकाणच्या गळतीची दुरुस्ती करण्यासाठी आणखी एक दिवस लागला. दुरुस्तीचे संपूर्ण काम काल सायंकाळी पाच वाजता पूर्ण झाले असून, त्यानंतर गावातील पाणीपुरवठा पूर्ववत सुरू करण्यात आला आहे."

— भास्कर घुडे, पडघा ग्रामपंचायत अधिकारी

"पडघ्यात पाणीपुरवठ्याची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. वारंवार जलवाहिनी फुटते, दुरुस्ती केली जाते आणि पुन्हा काही दिवसांत तीच परिस्थिती निर्माण होते. पाणीपुरवठा सुरू केल्याचे सांगितले जात असले तरी अनेक घरांमध्ये अद्याप पुरेसे पाणी पोहोचत नाही. वाढती लोकसंख्या आणि जुनी पाणीपुरवठा व्यवस्था लक्षात घेता केवळ तात्पुरती डागडुजी करून हा प्रश्न सुटणार नाही. सुमारे १८ कोटी रुपयांची नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर झाली असेल, तर ती प्रत्यक्षात कधी येणार? नागरिकांना पाण्यासाठी वारंवार धावपळ करायला लावणे थांबवून प्रशासनाने तातडीने ठोस आणि कायमस्वरूपी उपाययोजना करावी."

— मनोज गुंजाळ, पडघा ग्रामस्थ

# मासिक समन्वय सभेत विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा

ठाणे : (स. गांवकरी)

जिल्हा परिषद, ठाणे अंतर्गत विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या अध्यक्षतेखाली आज, दि. २४ सप्टेंबर २०२६ रोजी बी. जे. हायस्कूल येथे मासिक समन्वय सभा संपन्न झाली. जिल्ह्यातील विविध विकासकामे, शासनाच्या योजना, अभियानांची प्रभावी अंमलबजावणी, निधीचा विनियोग तसेच नागरिकाभिमुख सेवा याबाबत या बैठकीत सविस्तर आढावा घेण्यात आला.



बैठकीत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ग्रामपंचायतींनी करावयाच्या कामकाजाचा, तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेअंतर्गत पीएम सूर्यघर योजना, केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत योजनांची कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्याबाबत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार यांनी सविस्तर आढावा घेतला. योजनांच्या अंमलबजावणीदरम्यान येणाऱ्या अडचणी व समस्यांबाबत संबंधित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

जिल्हा परिषदेच्या विविध विभागांकडील निधी खर्चाची सद्यस्थिती, स्थानिक निधी लेखा शाखा, पंचायत समिती स्तरावरील कामकाज, कॅश बॅलन्स, बँक ताळमेळ, गुंतवणूक तसेच निधी व खर्चाचा अहवाल याबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रत्येक विभागाने योजनानिहाय निधी व खर्चाची माहिती अद्ययावत ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. जिल्हा परिषद योजना डॅशबोर्ड संदर्भातील कामकाजाचाही मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर यांच्या मार्गदर्शनाखाली आढावा घेण्यात आला.

आपले सरकार सेवा केंद्र पोर्टलवरील प्रलंबित तक्रारींचे तातडीने निवारण करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. तसेच प्रलंबित सेवानिवृत्ती प्रकरणे, विभागीय चौकशी, गट विमा प्रकरणे आणि अनुकंपा नियुक्ती प्रस्ताव याबाबत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे यांच्या मार्गदर्शनाखाली आढावा घेण्यात आला.

जनसुविधा व नागरी सुविधा कामांना तांत्रिक मान्यता, अंगणवाडी इमारतींसाठी जागा उपलब्धतेचा आढावा तसेच संबंधित कामांची सद्यस्थिती याबाबत विभागप्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली चर्चा करण्यात आली.

सेवा संकल्प अभियानांतर्गत शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या चित्रकला स्पर्धेचे नियोजन काटेकोरपणे करण्याबाबत शिक्षण विभागाला सूचना देण्यात आल्या. विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन उपक्रम राबविणे तसेच शिष्यवृत्ती परीक्षेचे प्रभावी नियोजन याबाबतही बैठकीत चर्चा करण्यात आली. सेवा संकल्प अभियान, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान, जनसुविधा, घरपट्टी, पाणीपट्टी, ग्रामपंचायत दप्तर तपासणी, ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजना, ई-मालमत्ता आदी विषयांवर उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे यांच्या मार्गदर्शनाखाली सविस्तर आढावा घेण्यात आला.

ग्रामपंचायतींच्या स्तरावर विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी, नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सेवा तसेच संबंधित कामकाजाची नोंद व अद्ययावत माहिती ठेवण्याबाबत चर्चा करण्यात आली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.

पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे

पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

कोकण विभागीय कार्यालय : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र, २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २८० । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी
महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई...
AVP NEWS
समर्थ गांवकरी NEWS
संपादक : डॉ. विश्वास आनंदराव आरोटे
न्याय, निष्पक्ष आणि निर्भीड पत्रकारिता... हीच आमची ओळख!
बातम्या, जाहिराती व सदस्यता साठी संपर्क साधा.

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासून २००० के व्ही ए
जनरेटर विक्री | दुरुस्ती व देखभाल | तज्ज्ञ तंत्रज्ञ | विश्वासाई सेवा वेळेत काम
संपर्क +91-8286562340 / 9004511593 8652653990 / 8286562350
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053, Sector - 5 Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com | Website: www.adarshengineering.net

शुक्रवार दि. २५ सप्टेंबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# दुष्काळाचा 'जीआर' आज काढणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; 'ट्रिगर वन'नुसार निर्णय, हेक्टरी मदत, चारा-पाणीटंचाईवर उपाय आणि रब्बी पेरणीसाठी मदत देणार

**अमरावती (समर्थ गांवकरी)**

अमरावती विभागात सर्व जिल्ह्यांत दुष्काळाची झळ पोहोचली आहे. यामुळे पिके संकटात आली आहेत. शेतकऱ्यांना दिलासा मिळावा म्हणून या भागाचा दौरा केला आहे. शेतकऱ्यांना तातडीने मदत व्हावी, यासाठी दुष्काळाच्या संहितेच्या 'ट्रिगर-१'नुसार देण्यात येणाऱ्या मदतीचा आदेश उद्याच काढण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

वाशिम येथील दुष्काळग्रस्त भागाचा दौरा केल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी विभागीय आयुक्त नयना गुंडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, वाशिमचे जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्यासमवेत अमरावती विमानतळ येथे चर्चा केली. त्यानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी केंद्राच्या मदतीची वाट न पाहता राज्य शासनाकडून तातडीने मदत देण्यात येईल. तसेच केंद्राच्या मदतीसाठी आवश्यक असणारे पंचनामे आदी प्रक्रिया पूर्ण करून मदतीसाठी प्रस्ताव पाठवण्यात येईल.

शेतकऱ्यांसाठी मदतीचा आदेश तातडीने काढणे गरजेचे आहे. सर्वच भागात मोठ्या प्रमाणावर दुष्काळ असल्याने मदत करण्यात येणार आहे.

येत्या काळात चाराटंचाई, पाणीटंचाईबाबत उपाययोजना करून अन्नधान्याचीही मदत करावी लागणार आहे. शेतकऱ्यांच्या पाल्यांच्या शिक्षणात खंड पडू नये, यासाठी थेट मदत करण्यात येईल.

रब्बीमध्ये काही ठिकाणी उपलब्ध असलेल्या पाण्यावर पिके घेण्याबाबत तपासणी करण्यात येईल. तसेच रब्बी पिके घेण्यासाठी शेतकऱ्यांना मदत करण्यात येईल. तसेच, रोजगार उपलब्ध होण्यासाठी जलसंधारणाच्या कामावर भर देण्यात येईल. जलसाठे आटलेले असल्यामुळे त्यातील गाळ काढणे, जलतारा स्ट्रक्चर उभारणे, तसेच दुरुस्ती करणे आवश्यक असलेले तलाव शोधून त्यांची दुरुस्ती करण्यात येईल.

सर्वदूर पिकांची परिस्थिती सारखीच असल्यामुळे राज्य शासनाने मदतीचे धोरण आखले आहे. शेतकऱ्यांना करण्यात येणारी ही मदत दिवाळीपूर्वी मिळेल, याचे नियोजन केले जाईल. राज्य शासनाने कर्जमाफी केली असून कर्जाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत आहे. कर्जमाफी




मिळालेल्या शेतकऱ्यांना बँकांना नियमाप्रमाणे कर्ज द्यावेच लागेल. त्यासोबतच शेतमालाची शासकीय दराने खरेदी केली जाईल. यासाठी लवकरच नोंदणी सुरू केली जाईल. जिल्हा शासकीय रुग्णालयात लागलेल्या आगीचा अहवाल सार्वजनिक केला जाणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

# अहिल्यानगर जिल्हा बँकेच्या निवडणुकीचा बिगुल; या दिवशी मतदान

## २८ सप्टेंबरपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात; २१ संचालकांच्या जागांसाठी निवडणूक प्रक्रिया

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीचा कार्यक्रम निश्चित झाला असून, येत्या २ नोव्हेंबर रोजी मतदान तर ३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी करण्यास राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणाने मान्यता दिली आहे. बँकेच्या २१ संचालकांच्या जागांसाठी ही निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे.



निवडणुकीसाठी २८ सप्टेंबरपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात होणार असून, ५ ऑक्टोबरपर्यंत अर्ज दाखल करता येणार आहेत. या कालावधीत सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत नगर येथील भाजीपाला मार्केट यार्डच्या मागील बाजूस असलेल्या चाहूराना बुद्रुक शाखेतील निवडणूक कार्यालयात उमेदवारी अर्ज स्वीकारले जाणार आहेत. दररोज दाखल झालेल्या उमेदवारी अर्जांची यादी त्याच दिवशी सायंकाळी ४ वाजता प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

६ ऑक्टोबर रोजी उमेदवारी अर्जांची छाननी करण्यात येऊन वैध उमेदवारांची यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानंतर ७ ते २१ ऑक्टोबर या कालावधीत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची संधी राहणार आहे. इच्छुक उमेदवार विहित नमुन्यात अर्ज दाखल करून या कालावधीत निवडणुकीतून माघार घेऊ शकणार आहेत.

यानंतर २२ ऑक्टोबर रोजी अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. आवश्यक असल्यास २ नोव्हेंबर रोजी मतदान घेण्यात येईल, तर ३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी केली जाणार आहे.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होण्यास आता अवघे काही दिवस शिल्लक आहेत. त्यामुळे इच्छुक उमेदवार, विविध गट तसेच सहकार क्षेत्रातील नेत्यांच्या हालचालींना वेग येण्याची शक्यता आहे.

नोव्हेंबर महिन्यात ८ नोव्हेंबर रोजी लक्ष्मीपूजन होणार असून त्यापूर्वीच २ नोव्हेंबरला जिल्हा बँकेसाठी मतदान होत आहे. त्यामुळे सहकार क्षेत्रातील या निवडणुकीत 'लक्ष्मी'ची कृपादृष्टी नेमकी कोणावर पडणार, याचा फैसला मतमोजणीनंतरच होणार आहे.

# कोतुळ आदिवासी सोसायटीच्या कारवाईवर मनोज देशमुख यांचे आक्षेप!

**■ चौकशी अहवालातील रक्कम व वृत्तपत्रांतील आकडेवारीत तफावत असल्याचा दावा; सात संचालकांच्या अपात्रतेच्या प्रक्रियेवरही प्रश्नचिन्ह?**

**कोतुळ (समर्थ गांवकरी)**

सध्या चर्चेत असलेल्या कोतुळ आदिवासी विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या संदर्भात गेल्या दोन दिवसांत विविध वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेल्या बातम्यांमधील आकडेवारी चुकीची असून, प्रत्यक्ष वस्तुस्थिती वेगळी असल्याचा दावा अगस्तीचे संचालक मनोज देशमुख यांनी केला आहे. संस्थेच्या मागील वर्षाच्या अहवालानुसार एकूण ३७ लाख ५९ हजार ९७१ रुपये ६५ पैसे रक्कम संस्थेचे सचिव व दोन लिपिक यांच्या ताब्यात असल्याचे प्राथमिकदृष्ट्या निदर्शनास आले होते. त्यानंतर संस्थेचे विद्यमान अध्यक्ष, संचालक मंडळ व संस्थेचे मार्गदर्शक म्हणून मनोज देशमुख यांनी सचिव व दोन्ही लिपिकांना संस्थेत रक्कम जमा करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार प्रत्येकी १२ लाख २८ हजार ५०० रुपये भरण्याचे सांगण्यात आले. सचिव दादाभाऊ साबळे व लिपिक दीपक परशुरामी यांनी प्रत्येकी १२ लाख २८ हजार ५०० रुपये संस्थेत जमा केले; मात्र लिपिक रोहिदास जगताप यांनी त्यांच्या वाट्याची रक्कम जमा करण्यासाठी वेळ मागितल्याचे देशमुख यांनी सांगितले.

यानंतर काही सभासदांनी संस्थेची वरिष्ठ पातळीवर चौकशी करण्याची मागणी करत तालुका सहाय्यक निबंधक वाघमारे यांच्याकडे तक्रार दाखल केली. सहकार विभागाच्या आदेशानुसार बाबासाहेब शंकर पगारे यांची प्राधिकृत चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करून संस्थेची चौकशी करण्यात आली. चौकशी अहवालानुसार संस्थेत शिल्लक राहिलेल्या १२ लाख ५ हजार ५०० रुपयांची जबाबदारी सचिव दादा पाटील साबळे, लिपिक दीपक परशुरामी व लिपिक रोहिदास जगताप यांच्यावर प्रत्येकी ४ लाख १ हजार ८३३ रुपये ३३ पैसे निश्चित करण्यात आल्याचे देशमुख यांनी सांगितले. तसेच चौकशी शुल्कापोटी संचालक मंडळावर १ लाख ८०० रुपये, म्हणजेच प्रत्येकी संचालकावर ५ हजार ६०० रुपये जबाबदारी निश्चित करण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

गेल्या दोन-तीन दिवसांत प्रसिद्ध झालेल्या वृत्तांमध्ये दबावापोटी अथवा चुकीच्या माहितीच्या आधारे मोठ्या प्रमाणात चुकीची आकडेवारी प्रसिद्ध झाल्याचा आरोप मनोज देशमुख यांनी केला आहे. सहाय्यक निबंधकांनी दबावाखाली घाईगडबडीत निर्णय घेतल्याचा आरोपही त्यांनी केला. शासनाच्या कर्जमाफीच्या घोषणेमुळे अनेक सहकारी संस्थांमधील कर्जदारांच्या थकबाकीच्या परिस्थितीत बदल झाला असल्याचे सांगत, अशाच प्रकारचा निकष सर्व सहकारी संस्थांना लागू केल्यास तालुक्यातील अनेक संस्थांच्या संचालकांवर कारवाई होऊ शकते, असा दावा त्यांनी केला. काही संचालकांनी नोटीस मिळाल्यानंतर संस्थेत रक्कम जमा केली असून, काहींना कर्जमाफीअंतर्गत लाभ मिळालेला आहे. त्यामुळे सद्यस्थितीत संबंधित संचालक थकबाकीदार नसल्याचे देशमुख यांनी सांगितले. तसेच कोतुळ आदिवासी विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या सात संचालकांच्या अपात्रतेच्या कारवाईदरम्यान आपली बाजू मांडण्यासाठी प्रत्यक्षात केवळ एकदाच संधी देण्यात आली; मात्र आदेशामध्ये तीन वेळा सुनावणी झाल्याच्या तारखा नमूद करून दिशाभूल करण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला. या सर्व बाबींचे लेखी पुरावे आपल्याकडे असल्याचे अगस्ती सहकारी साखर कारखान्याचे संचालक मनोज देशमुख यांनी सांगितले.

# विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकांसाठी तज्ज्ञ समिती गठित

## उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत 'दादा' पाटील यांची माहिती

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ तसेच विद्यार्थी परिषद निवडणुकांसंदर्भातील एकरूप परिनियमांच्या अनुषंगाने विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकांसाठी तज्ज्ञ समिती गठित केली असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली.

विद्यार्थी परिषद निवडणुकांशी संबंधित विविध बाबींचा सखोल अभ्यास करून शासनाला आवश्यक त्या उपाययोजना व शिफारशी सादर करण्याची जबाबदारी समितीवर सोपविण्यात आली आहे.

या समितीच्या अध्यक्षपदी मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

समितीमध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अजय भामरे यांच्यासह विविध विद्यापीठे व महाविद्यालयांतील तज्ज्ञांचा समावेश आहे. मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे हे समितीचे सदस्य सचिव आहेत.

# पारनेरच्या पाणी योजनेसाठी शरद पवारांचा पुढाकार

## मुख्यमंत्र्यांकडून तत्काळ कार्यवाहीचे निर्देश

**पारनेर (समर्थ गांवकरी)**

पारनेर शहराच्या दीर्घकालीन व शाश्वत पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने प्रस्तावित असलेल्या ६३ कोटी ४७ लाख रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेला अंतिम मंजुरी देऊन आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी खासदार शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली. यासंदर्भात पवार यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन त्यांना निवेदन व पत्र दिले. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी नगरविकास विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना तत्काळ आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. खासदार नीलेश लंके यांच्यासह नगरपंचायतचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

पारनेर शहराचा पाणीप्रश्न अनेक वर्षांपासून कायमस्वरूपी तोडग्याच्या प्रतीक्षेत आहे. शहराची वाढती लोकसंख्या आणि भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन दीर्घकालीन व शाश्वत पाणीपुरवठा व्यवस्था उभारणे आवश्यक आहे. यासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत प्रस्तावित करण्यात आलेल्या या योजनेला गती देण्याची मागणी पवार यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली.

या पाणीपुरवठा योजनेची अंदाजित किंमत ६३.४७ कोटी रुपये असून, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रादेशिक विभाग, नाशिक यांच्याकडून प्रकल्पाला तांत्रिक मान्यता देण्यात आल्याचे पवार यांनी पत्रात नमूद केले आहे.

त्यामुळे आता शासनस्तरावर प्रशासकीय मंजुरी आणि निधी उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक आहे.

योजनेच्या अंदाजित खर्चामध्ये जीएसटी, कामगार विभागाचे शुल्क तसेच महावितरणचे शुल्क यांचा समावेश करण्यात आला आहे. तांत्रिक स्तरावरील प्रक्रिया पूर्ण झाल्या असल्याने प्रकल्पाच्या पुढील कार्यवाहीसाठी शासनाची अंतिम मंजुरी महत्त्वाची ठरणार आहे.

पारनेर शहरासाठी ही योजना अत्यंत महत्त्वाची असून, तिची अंमलबजावणी झाल्यास नागरिकांना दीर्घकालीन आणि शाश्वत पाणीपुरवठा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रकल्पास अंतिम मंजुरी देऊन आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना निर्देश द्यावेत, अशी मागणी पवार यांनी केली. पवार यांच्या पत्राची दखल घेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी संबंधित अधिकाऱ्यांना कार्यवाहीच्या



सूचना दिल्याने पारनेरच्या पाणी योजनेच्या मंजुरीच्या प्रक्रियेला आता शासनस्तरावर गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## संक्षिप्त

**भारताचा निशाणा अचूक!**

### आशियाई क्रीडा स्पर्धेमध्ये अनंतजीत-परिनाझला कांस्यपदक

**नागोया/नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)**

२०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने नेमबाजीच्या खेळात आणखी एक अभिमानास्पद कामगिरी केली आहे. भारतीय नेमबाज अनंतजीत सिंग नरुका आणि परिनाझ धालीवाल या जोडीने मिश्र सांघिक स्किट प्रकारात उत्कृष्ट खेळ करत देशासाठी कांस्यपदक जिंकले आहे. विशेष म्हणजे, आशियाई क्रीडा स्पर्धेच्या इतिहासातील मिश्र सांघिक स्किट प्रकारातील भारताचे हे पहिलेच पदक ठरले असून, या विजयामुळे भारताने पदकतालिकेत १५ वे स्थान पटकावले आहे.

### विसर्जनाच्या दिवशी रात्रभर धावणार ३ लाईन मेट्रो

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

मुंबई मेट्रो ३ ने प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी आनंदाची बातमी आहे. अनंत चतुर्दशीच्या पार्श्वभूमीवर गणपती विसर्जनासाठी मुंबई मेट्रो लाईन ३ ची सेवा रात्रभर सुरू राहणार असल्याचे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून जाहीर करण्यात आले आहे. गणपती बाप्पाच्या निरोपासाठी जाणाऱ्या भाविकांना या विशेष सेवेचा लाभ घेता येणार आहे. आरे ते कफ परेड मार्गावर धावणारी ही मेट्रो गणेशभक्तांच्या दृष्टीने फार महत्त्वाची ठरणार आहे. मेट्रो सेवेसोबतच रेल्वे मार्गिकेवरही विशेष सेवा भाविकांना पुरवली जाणार आहे. एमएमआरसीने पूर्वी मध्यरात्री १२ वाजेपर्यंत गणेश भक्तांसाठी मेट्रो सेवा देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु अनंत चतुर्दशीच्या आदल्या दिवशी एमएमआरसीने गणेश भक्तांसाठी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. मुंबई मेट्रो लाईन ३ ची सेवा रात्रभर सुरू राहणार आहे. विसर्जनानंतर होणारी प्रवाशांची संभाव्य गर्दी लक्षात घेऊन प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. मेट्रोनंतर पश्चिम रेल्वेवरही विशेष रेल्वे चालवल्या जाणार आहेत. २५ सप्टेंबरच्या मध्यरात्री चर्चगेट- विरार स्थानकादरम्यान १२ विशेष लोकल चालवण्याचा निर्णय घेतला आहे.

### कोल्ड ड्रिंक्सच्या बाटल्यांना खाली पंचकोनी का असतात?

**पाण्याच्या बाटलीपेक्षा वेगळी रचना असण्याचं कारण काय?**

आपण सर्वजण थंड पेय किंवा पाण्याची बाटली विकत घेतो. तुम्ही कधी निरीक्षण केलं आहे का? कोल्ड ड्रिंक्स आणि पाण्याच्या बाटल्यांच्या रचनेत वेगळेपणा असतो. पाण्याच्या बाटलीचा तळ हा पूर्णपणे सपाट असतो. तर कोल्ड ड्रिंक्सच्या बाटल्या रचनेने थोड्या वेगळ्या असतात. कोल्ड ड्रिंक्सच्या बाटल्यांची वैशिष्ट्यपूर्ण रचना केलेली असते. त्यात पाच उंचवटे किंवा फुगवटे असतात. ही रचना बाटली सुंदर दिसावी म्हणून केली असावी असं अनेकांना वाटतं. पण तसं नाही. त्यामागे शास्त्रीय कारण आहे. कोल्ड ड्रिंक्स बाटल्यांच्या अनोख्या रचनेला कॉरुगेटेड बॉटम किंवा पेंटापॉड असं म्हटलं जातं. पण ही रचना करण्यामागचं कारण काय असावं? असा प्रश्न आता तुम्हाला पडला असेल, तर त्याचं उत्तर तुम्हाला पुढे मिळेल.

कोल्ड ड्रिंक्सच्या बाटलीचा आकार वेगळा असतो कारण...- कोल्ड ड्रिंक्समध्ये कार्बन डायऑक्साइड वायू भरलेला असतो. त्यामुळे बाटली उघडताच फेस बाहेर पडतो किंवा जोरात हवा बाहेर पडते. कोल्ड ड्रिंक्सची बाटली दाबून भरली जाते किंवा हलवली तर त्या बाटलीच्या आतील बाजूस वायूचा दाब प्रचंड वाढतो. इतकंच काय तर कोल्ड ड्रिंक्स कायम थंड करून विकली जातात. जेव्हा एखादा द्रव पदार्थ गरजेपेक्षा जास्त थंड होतो तेव्हा त्याच्या आकारमानात आणि घनतेत बदल होतो. जर कोल्ड ड्रिंक्सच्या बाटलीचा तळ सपाट असता तर ती त्या दाबाने फुगेल किंवा फुटेल. पण तळाशी असलेल्या पाच उंचवटी रचनेमुळे वायुचा दाब कमी होतो. तसेच हा दाब समान रितीने पसरतो. हे कोपरे स्प्रिंगप्रमाणे काम करतात. त्यामुळे ही बाटली फुटण्याची शक्यता कमी होते.

# संगमनेरात २८ सप्टेंबरला बालकुमार साहित्य संमेलन

## शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची नांदी : सौ.दुर्गाताई तांबे

**संगमनेर (समर्थ गांवकरी)**

मातृभाषेविषयी निष्ठा वृद्धिंगत करणे, वाचन संस्कृतीला चालना देणे, मराठी भाषेचा प्रचार – प्रसार करणे तसेच विद्यार्थी व पालकांमध्ये साहित्याविषयी सजगता निर्माण करण्याच्या उद्देशाने संगमनेर येथे सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी बालकुमार साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती स्वागताध्यक्ष सौ. दुर्गाताई तांबे यांनी दिली आहे.

लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या यशोधन जनसंपर्क कार्यालयात पत्रकार परिषदेत माहिती देताना त्या म्हणाल्या की, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, शाखा संगमनेर, समर्थ युवा फाउंडेशन आणि मराठी भाषा संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने हे संमेलन होत आहे.

सोमवार दिनांक २८ सप्टेंबर रोजी संमेलनाध्यक्ष म्हणून प्रसिद्ध वक्ते व साहित्यिक डॉ.संजय कळमकर, तर उद्घाटक म्हणून ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक डॉ.स्वाती महाळंक उपस्थित राहणार आहेत. राज्याचे माजी शिक्षण व महसूल मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात, संमेलनास महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यवाह प्रसाद मिरासदार, मा.आ.डॉ.सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे,महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा संगमनेरचे कार्यवाह डॉ.नितीन संगमनेरकर आणि शारदा शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा सुवर्णाताई मालपाणी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

संमेलनात विविध ज्ञान, रंजन आणि प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. संमेलनाध्यक्ष डॉ. संजय कळमकर यांचे प्रभावी व्याख्यान होणार आहे. तसेच श्रीमती संगीता पुंडगे यांचा मनोरंजनात्मक 'बोलक्या बाहुल्या' हा कार्यक्रम, प्रसिद्ध गायक त्यागराज खाडीलकर व दीपिका जोग यांचा 'अक्षर गाणी' हा प्रबोधनपर कार्यक्रम होणार आहे. शालेय पाठ्यपुस्तकातील संगीतमय कवितांचे गायन प्रकाश पारखे व विद्यार्थी सादर करणार आहेत. कार्यक्रमाचे निवेदन संदीप वाकचौरे करणार असून ध्वनी संयोजनाची जबाबदारी संतोष गोटस्कर यांच्यावर आहे.

संमेलनात राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने पुस्तक प्रदर्शन व विक्री आयोजित करण्यात आली आहे. तसेच ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक व लेखक योगेश सोमण यांचा 'ज्योती' हा लघुपट आणि मराठी भाषा संचालनालयाचा माहितीपट दाखविण्यात येणार आहे.

अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, शाखा संगमनेर ही संस्था २०१० पासून साहित्य, संस्कार, संस्कृती, ज्ञान आणि कला विषयक विविध उपक्रम राबवत आहे. संस्थेचे संस्थापक डॉ. संजय मालपाणी यांचे या उपक्रमांना सहकार्य लाभत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, शाखा संगमनेरचे अध्यक्ष अनिल देशपांडे यांच्या पाठपुराव्यामुळे संगमनेरला या बालकुमार साहित्य संमेलनाचा बहुमान मिळाला आहे. आगामी २०२७ मध्ये पुणे येथे महाराष्ट्र साहित्य परिषदेचे १०० वे साहित्य संमेलन होणार असून, त्यानंतरचे १०१ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन २०२८ मध्ये संगमनेर येथे व्हावे, यासाठी प्रयत्न करणार असल्याचे दुर्गाताई तांबे यांनी सांगितले.

या साहित्य संमेलनात संगमनेर शहरासह ग्रामीण भागातील विविध शाळांचे प्रतिनिधी, सर्व पत्रकार बांधव सहभागी होणार आहेत. विद्यार्थ्यांमध्ये



वाचनाची आवड निर्माण करणे आणि मराठी भाषेबद्दल आत्मीयता वाढविणे हा संमेलनाचा प्रमुख उद्देश आहे.

संमेलन यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष अनिल देशपांडे, उपाध्यक्ष डॉ. विवेक वाकचौरे, कार्याध्यक्ष अरविंद गाडेकर, सचिव दर्शन जोशी, कोषाध्यक्ष अरुण तिळे, सहसचिव चारुदत्त काटकर तसेच सदस्य शशांक गंधे, प्रकाश पारखे, अनिल सोमणी आणि ओंकार बिहाणी प्रयत्नशील आहेत.

तरी या एकदिवसीय साहित्य संमेलनात संगमनेर शहर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून बालकुमार साहित्य संमेलनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्वागताध्यक्ष सौ.दुर्गाताई तांबे यांनी केले आहे.

# पोषण माह २०२६ तसेच सेवा संकल्प अभियान अंतर्गत मुरबाड येथे बाल संरक्षण समितीबाबत प्रशिक्षण

## बालकांचे हक्क, बाल विवाह प्रतिबंध व संरक्षणाबाबत अंगणवाडी सेविकांना मार्गदर्शन

**ठाणे (समर्थ गांवकरी)**

पोषण माह २०२६ तसेच सेवा संकल्प अभियान अंतर्गत समुदाय सहभाग, स्वामित्व व उत्तरदायित्व या संकल्पनेनुसार पंचायत समिती मुरबाड येथील शांताराम भाऊ घोलप सभागृहात अंगणवाडी सेविकांसाठी बाल संरक्षण समिती संदर्भात प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कमिटेड कम्युनिटीज डेव्हलपमेंट ट्रस्ट (CCDT), मुंबई आणि महिला व बाल विकास विभाग, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी CCDT संस्थेचे प्रोजेक्ट मॅनेजर रामेश्वर भाले यांनी बालकांचे हक्क व अधिकार, बाल संरक्षण तसेच बालकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांबाबत अंगणवाडी सेविकांना मार्गदर्शन केले. बालकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर समुदायाचा सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचे



त्यांनी स्पष्ट केले. प्रशिक्षणामध्ये बाल संरक्षण समितीची नव्याने स्थापना, समितीमध्ये किमान ९ आणि कमाल ११ सदस्य असणे, तसेच समितीच्या माध्यमातून बालकांच्या संरक्षणासाठी प्रभावीपणे कार्य करण्याबाबत माहिती देण्यात आली. त्याचबरोबर बाल विवाह प्रतिबंधासाठी ग्रामपंचायत स्तरावर सभा घेऊन जनजागृती करणे, बाल विवाह रोखण्यासाठी समुदायाने सतर्क राहणे आणि बाल विवाहाची माहिती मिळाल्यास तात्काळ चाइल्ड हेल्पलाइन क्रमांक १०९८ वर संपर्क साधणे, याबाबतही अंगणवाडी सेविकांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी CDPO मुरबाड-१ तारमळे, CDPO मुरबाड-२ अपर्णा भोईर, CCDT संस्थेचे समन्वयक वैभव गायकवाड, पूजा ढमके, बाल संरक्षण अधिकारी दीपक गाडेकर, चाइल्डलाइन स्टाफ स्विटी जोसेफ व रोहिणी चौधरी यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमादरम्यान पोषण पाककृती, रानभाज्यांचे महत्त्व आणि संतुलित आहाराचे महत्त्व याबाबतही माहिती देण्यात आली. शेवटी उपस्थितांनी पोषण प्रतिज्ञा तसेच बाल विवाह प्रतिबंध प्रतिज्ञा घेऊन बालकांच्या संरक्षणासाठी आणि कुपोषणमुक्त समाज निर्मितीसाठी सामूहिक सहभागाची बांधिलकी व्यक्त केली.

# नानजीभाई ठक्कर यांच्या वाढदिवसानिमित्त डोंगरगाव जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांना शालेय वह्यांचे वाटप

## डोंगरगाव परिसरातील तीन शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



**अकोले (समर्थ गांवकरी)**

थोर समाजसेवक तथा दानशूर व्यक्तिमत्त्व नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणेवाला) यांच्या वाढदिवसानिमित्त दैनिक समर्थ गावकरी वतीने डोंगरगाव परिसरातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शालेय वह्यांचे वाटप करण्यात आले.

विश्वासराव आरोटे साहेब राज्य सरचिटणीस तथा संपादक दैनिक समर्थ गावकरी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष अशोकराव उगले यांच्या उपस्थितीत सरोदे वस्ती, पिंपळमळा क्र. १ आणि पिंपळमळा क्र. २ येथील शाळांमध्ये हा सामाजिक उपक्रम उत्साहात पार पडला.

विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देत त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचा हा उपक्रम राबविण्यात आला. सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

यावेळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सरोदे वस्ती शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संतोष सरोदे, पिंपळमळा क्र. २ शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रविंद्र घुले, पिंपळमळा क्र. १ शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमोल गुंजाळ, वसंत सहाणे, डॉ. संतोष उगले, रमेश उगले, ज्ञानेश्वर उगले, बंडोपंत उगले, अमोल उगले, अनिकेत वर्पे, ज्ञानेश्वर सहाणे, सचिन उगले, सुरज दातीर,रमेश उगले आदी उपस्थित होते.

तसेच सरोदे वस्ती शाळेच्या मुख्याध्यापिका शकुंतला गोर्डे मॅडम, मनिषा उगले मॅडम, पिंपळमळा क्र. १ शाळेचे मुख्याध्यापक सतीशकुमार तळपे सर, संगीता थोरात मॅडम, पिंपळमळा क्र. २ शाळेचे मुख्याध्यापक प्रदीप उगले सर, योगिता उगले मॅडम यांच्यासह शिक्षकवृंद उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन देणाऱ्या या उपक्रमातून सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला. नानजीभाई ठक्कर यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# लिंपणगाव संस्थेचे नूतन चेअरमन लक्ष्मण भोईटे यांचा नागवडेंकडून सन्मान

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा तालुक्यातील राजकीय दृष्ट्या महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या लिंपणगाव सेवा संस्थेच्या चेअरमनपदी लक्ष्मण भोईटे यांची नुकतीच निवड झाल्याबद्दल कारखाना कार्यस्थळावर सहकार महर्षी नागवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे यांनी सन्मान केला ही संस्था स्थापन झाल्यापासून नागवडे गटाकडे आहे. या सन्मान सोहळ्यास नागवडे कारखान्याचे माजी संचालक ड अशोकराव रोडे, माजी सरपंच अरविंद कुरुमकर, संचालक दादासाहेब कुरुमकर, संभाजी लष्करे, ईश्वर रेवगे संपत होले, मोहन कोपनर, माजी सचिव दत्तात्रय खळदकर, पत्रकार नंदकुमार कुरुमकर, दादा टुले आदी यावेळी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना नागवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे बोलताना म्हणाले की, खाजगीकरणामुळे सहकार क्षेत्र मोठ्या अडचणीत आहे. भविष्यात कोणतीही सहकारी संस्था चालवताना काटकसर महत्त्वाची आहे. राज्य सरकारने कर्जमाफी योजना राबवली, अंमलबजावणी केली, परंतु कर्जमाफी होऊन देखील शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे वर्ग होत नाहीत. त्यामुळे सहकारी संस्था व सभासद यांच्यामध्ये सध्या संभ्रम आहे. असे सांगून चेअरमन श्री नागवडे पुढे म्हणाले की, सहकारी संस्थेत काम करताना संचालक मंडळाने काटकसरीने व धोरणात्मक निर्णय घेणे महत्त्वाचे आहे. अलीकडे संस्थेकडून कर्ज घेतल्यानंतर ते परतफेड करण्याची मानसिकता शेतकऱ्यांची राहिलेली नाही. त्यामुळे सहकारी संस्था मोठ्या अडचणीत येत आहेत. संस्थेचे पदाधिकारी म्हणून काम करत



असताना संस्था व सभासद यांचे हित जोपासणारे निर्णय अपेक्षित आहेत. असे सांगून श्री नागवडे आणखी पुढे म्हणाले की, लिंपणगावच्या सेवा संस्थेचे पदाधिकारी उत्तम प्रकारे काम करत आहेत. त्यामुळे भविष्यात संस्था टिकवण्यासाठी यापुढे सर्व संचालक मंडळाने एकोप्याने कारभार पाहून संस्थेचे अस्तित्व कायम ठेवावे, असे सांगून नूतन चेअरमन लक्ष्मण भोईटे यांना पुढील कार्यास श्री नागवडे यांनी भरभरून शुभेच्छा व्यक्त केल्या. यावेळी ड अशोकराव रोडे शुभेच्छा देताना म्हणाले की, नूतन चेअरमन लक्ष्मण भोईटे यांना माजी चेअरमन त्यांचे पिताश्री रामभाऊ भोईटे यांचा वारसा आहे. निश्चितपणे ते सेवा संस्थेचा कारभार उत्तम प्रकारे पार पाडतील.

# अरणगाव येथे गणेश मुर्तीची विटंबना, ग्रामस्थांन कडुन घटनेचा निषेध, अरणगाव कडकडीत बंद

## धार्मिक भावना दुखावल्याचा अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल

**जामखेड (समर्थ गांवकरी)**

जामखेड तालुक्यातील अरणगाव येथील श्री. अरणेश्वर मंदिराच्या समोरील सभामंडपात मुलांनी बसविण्यात आलेल्या गणपतीच्या मुर्तीची विटंबना करण्यात आली आहे. तसेच मंदिराच्या गाभाऱ्याचे गेटचे कुलुप देखील तोडण्यात आले असुन घटनास्थळी अज्ञात इसमाची चप्पल देखील आढळून आली आहे. या प्रकरणी जामखेड पोलीस स्टेशनला अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी अमोल सिताराम निगुडे (वय ४० वर्षे, धंदा- शेती, रा. अरणगाव, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर) यांनी जामखेड पोलीस स्टेशनला फीर्याद दिली आहे. फीर्यादी हे आपल्या कुटुंबासह अरणगाव येथे राहतात. या मंदिराची देखरेख करण्याचे काम फीर्यादी अमोल सिताराम निगुडे हे करत आहेत, तर शिवानंदन त्रिंबक दावणगिरे हे या मंदिरात पुजारी आहेत.

दिनांक २३ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६:०० वाजण्याच्या सुमारास फीर्यादी अमोल निगुडे हे अरणगाव येथे असताना, त्यांना रोहीत चावरे (रा. अरणगाव) यांचा फोन आला. रोहीत यांनी सांगितले की, आज दुपारी ३ ते ४ वाजेच्या दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमाने अरणेश्वर




मंदिराच्या गाभाऱ्याच्या बाहेरील बाजूस चप्पल सोडून दिली आहे. तसेच मंदिराच्या गाभाऱ्यातील गेटचे कुलूप तोडले आहे. मंदिरासमोर असलेल्या सभासमांडपात एका मित्र मंडळाने बसवलेल्या गणपतीच्या मूर्तीची देखील विटंबना करण्यात आली आहे.

# कोपरगावच्या लोकप्रतिनिधींचे काळे झेंडे दाखवून स्वागत !

**कोपरगाव (समर्थ गांवकरी)**

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी महत्वपूर्ण ठरणाऱ्या कोपरगाव तालुक्यातील रांजणगाव देशमुख आणि अंजनापूर येथील संयुक्तपणे राबवलेल्या ३३ एकर योजनेचे (अशासकीय) उद्घाटन करण्यास गेलेल्या आ.आशुतोष काळे यांना आज भाजप कोल्हे गटांच्या स्थानिक कार्यकर्त्यांच्या काळे झेंडे आणि निषेधाच्या घोषणांचा आणि रोषाचा सामना करावा लागला असल्याची धक्कादायक माहिती हाती आली आहे.त्याला दोन्ही गटाच्या कार्यकर्त्यांनी दुजोरा दिला आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी सुरू केलेली महत्त्वाची योजना आहे.योजनेचे मुख्य उद्दिष्ट शेतकऱ्यांना दिवसा शाश्वत आणि भरवशाची वीज देणे.शेतीसाठी लागणाऱ्या पारंपारिक विजेचा ताण कमी करणे असा आहे. उपकेंद्रांच्या ५ ते १० किलोमीटर परिघात सौर प्रकल्प उभारले जातात.निर्माण झालेली वीज थेट कृषी वाहिन्यांद्वारे शेतकऱ्यांना मिळते.राज्यातील कृषी फीडर्स सौर ऊर्जेवर आणण्याचे शासनाचे ध्येय असून त्या दिशेने सरकारचे काम जोरात सुरू आहे.वीज बिल थकवणाऱ्या शेतकऱ्यांचे गळ्यातील लोढणे काढून टाकायचे ठरवले आहे.त्यामुळे राज्य आणि देशभर या योजनेची वेगाने अंमलबजावणी सुरू आहे.कोपरगाव तालुक्यातील रांजणगाव देशमुख आणि अंजनापूर शिवारात अनुक्रमें १६ आणि १७ अशा एकूण ३३ एकर क्षेत्रात हा प्रकल्प उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.असे असताना आज सकाळी ११.३० वाजेच्या सुमारास कोपरगावचे आ.आशुतोष काळे यांनी या प्रकल्पाचे उद्घाटन करण्याचा घाट घातला होता.त्यावेळी त्यांना अंजनापूर येथून रांजणगाव देशमुखकडे जाताना अंजनापूर फाटा या ठिकाणी भाजप आ.विवेक कोल्हे गटांच्या कार्यकर्त्यांच्या रोषाचा सामना करावा लागला आहे.मात्र शिर्डी पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने व हातातील काळे झंडे हातातून काढून घेतल्याने त्यांचा काहीसा भ्रमनिरास झाला असल्याचे दिसून आले आहे.

त्यावेळी भाजपचे माजी युवा तालुकाध्यक्ष विक्रम पाचोरे,माजी तालुकाध्यक्ष कैलास रहाणे,प्रकाश गोर्डे,सचिन खालकर,अनिल खालकर,चीमा वर्पे,हरिभाऊ वर्पे,नानासाहेब वर्पे,अरुण वर्पे,अरुण गव्हाणे,बंडू थोरात,ध्यानदेव थोरात,महेश थोरात,माजी उपसभापती नानासाहेब गव्हाणे,डी.पी,औताडे,अशोक औताडे,प्रभाकर रहाणे,कोंडाजी रहाणे,हरिदास रहाणे,गोरक्षनाथ रहाणे,विजय डांगे,अनिल शिंदे,बाबासाहेब सोनवणे,भीमराज गुंजाळ,शिवाजी रहाणे,आणि परिसरातील कोल्हे गटाचे समर्थक कार्यकर्ते मोठ्या संख्येने एकवटले होते.त्यांनी यावेळी विधानपरिषदेचे आ.विवेक कोल्हे यांना सदर कार्यक्रमास निमंत्रण दिले नाही याबाबत रोष वक्त केला असून शासकीय कार्यक्रम पत्रिकेत त्यांचे नाव दिसले नाही. त्यांना सन्मानाने निमंत्रण दिले नाही.असा आरोप माजी तालुकाध्यक्ष कैलास रहाणे यांनी केला आहे. त्यामुळे आम्ही हा रस्ता अडवून या घटनेचा निषेध व्यक्त केला असल्याचे घटनेस माजी तालुकाध्यक्ष कैलास रहाणे यांनी दुजोरा दिला आहे.तर अंजनापूर येथील आ.काळे गटांचे कार्यकर्ते माजी सरपंच ध्यानेश्वर गव्हाणे यांनी त्यास दुजोरा दिला आहे.

दरम्यान या रांजणगाव देशमुख आणि अंजनापूर या शेजारी गावात सिजल इंडिया कंपनी लिमिटेड या खाजगी कंपनीने या दोन्ही ठिकाणी १० मेगा वॅट (एम.व्हि.ए.) क्षमतेचा हा प्रकल्प उभारणी केली आहे.त्यातील रांजणगाव देशमुख येथील सौर प्रकल्प कार्यान्वित झाला आहे.तर अंजनापूर येथील प्रकल्पाचे काम अद्याप अंतिम चरणात आहे.मात्र तरीही याचे उद्घाटन करण्याची आ.काळे यांनी घाई का केली हे समजायला मार्ग नाही.मात्र त्याची किंमत त्यांना आज चुकवावी लागली असल्याचे दिसून आले आहे.त्यांनी आज अंजनापूर येथील प्रकल्पाचे उद्घाटन करून ते रांजणगाव देशमुख येथील प्रकल्प उदघाटन करण्यास जात असताना त्यांना या रोषाचा सामना करावा लागला आहे.

दरम्यान आमचे प्रतिनिधीने याबाबत राहाता येथील महावितरण कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी आणि कनिष्ठ अधिकाऱ्यांनी या कार्यक्रमाबाबत कानावर हात ठेवले असून आपण आणि आमचे वरिष्ठ आणि कनिष्ठ अधिकारी कोणीही घटनास्थळी उपस्थित नव्हते असे स्पष्ट सांगितले आहे.सदर कार्यक्रम खाजगी कंपनीने यायोजित केला असल्याची माहिती दिल्याने तो अशासकीय असल्याचे उघड झाले आहे.यामुळे हा सौर प्रकल्प हा उजनी चारी आणि निळवंडे प्रकल्प ठरतो की काय अशी शंका उपस्थित होत आहे. कारण या पूर्वीही आ.आशुतोष काळे यांनी सिन्नर तालुक्यातील शहा येथील १३२ के.व्ही.ए.प्रकल्पाचे तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे हस्ते उद्घाटन करून याला जवळपास दोन वर्षाचा कालखंड उलटला आहे.तरीही ते कार्यान्वित झालेला नाही आणि शेतकऱ्यांना संपूर्ण दाबाने आजही वीज मिळत नाही.शिवाय कोपरगाव शहरासाठी पिण्याचे पाणी पुरविण्यास अहंम भूमिका निभावणाऱ्या पाच क्रमांकाच्या तलावाचे उद्घाटन करून अद्याप ते शहरातील नागरिकांना मिळालेले नाही.ते या अद्याप अपूर्ण असल्याचे माहिती काल तहसील कार्यालयात संपन्न झालेल्या आढावा बैठकीत अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.त्यामुळे अशा बेभरवशाच्या उद्घाटनांवर नागरिकांनी आणि शेतकऱ्यांनी किती भरवसा ठेवायचा असा प्रश्न निर्माण झाला आहे.

सदर उद्घाटनास सिजल इंडिया लिमिटेडचे प्रेसिडेंट अय्यालुसामी सरवणम,इन्फिसोल एनर्जी लिमिटेडचे संचालक दिपक लड्डा,देवानंद कोटगिरे,रमण लड्डा,गटविकास अधिकारी स्वप्नील वाळूंज,कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व संलग्न संस्थांचे पदाधिकारी,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी,पंचक्रोशीतील सरपंच,उपसरपंच,ग्राम

दरम्यान आमचे प्रतिनिधीने याबाबत राहाता येथील महावितरण कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी आणि कनिष्ठ अधिकाऱ्यांनी या कार्यक्रमाबाबत कानावर हात ठेवले असून आपण आणि आमचे वरिष्ठ आणि कनिष्ठ अधिकारी कोणीही घटनास्थळी उपस्थित नव्हते असे स्पष्ट सांगितले आहे.सदर कार्यक्रम खाजगी कंपनीने यायोजित केला असल्याची माहिती दिल्याने तो अशासकीय असल्याचे उघड झाले आहे.यामुळे हा सौर प्रकल्प हा उजनी चारी आणि निळवंडे प्रकल्प ठरतो की काय अशी शंका उपस्थित होत आहे.



दरम्यान या घटनेबाबत शिर्डी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक कल्पेश चव्हाण यांचेशी संपर्क साधला असता त्यांनी आ.विवेक कोल्हे यांचे प्रोटोकॉल नुसार कार्यक्रम पत्रिकेत नाव नसल्याने तेथील कार्यकर्ते नाराज होते.त्यामुळे त्यांनी तसा प्रयत्न केला असल्याच्या घटनेस दुजोरा दिला आहे. मात्र आम्ही वेळीच दखल घेऊन त्यांना आवर घालण्याचा प्रयत्न केला आहे.त्यामुळे पुढील अनर्थ टळला असल्याचे सांगितले आहे.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### कुकडीच्या अध्यक्षपदी घावटे तर उपाध्यक्षपदी गाडीकर यांची निवड....



पारनेर (समर्थ गांवकरी)

पारनेर तालुक्यातील जवळे येथील कुकडी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी अँड. गायत्री घावटे यांची तर उपाध्यक्षपदी वैशाली गाडीलकर यांची निवड झाली. पारनेर तालुका कार्यक्षेत्र असलेल्या कुकडी सहकारी पतसंस्थेच्या पंचवार्षिक अधिमंडळाची निवडणूक नुकतीच बिनविरोध संपन्न झाली होती. कुकडीच्या इतर संचालक पदी गजानन सोमवंशी, गोविंद बडवे, नवनाथ सालके,सुरेश कारखिले,सतीश शेळके, प्रभाकर घावटे, संतोष तांबे, साहेबराव मोरे, आणि अशोक शिंदे यांची बिनविरोध निवड झाली होती. वर्षभरापूर्वी स्थापन झालेल्या कुकडी सहकारी पतसंस्थेकडे सुमारे एक कोटी रुपयांच्या ठेवी असून सत्तर लक्ष रुपयांचे सुरक्षित कर्ज वाटप केलेले आहे. पतसंस्थेच्या सर्व सभासदांनी या अधिमंडळाला बिनविरोध निवडून दिल्यामुळे आमच्यावर जो विश्वास दाखवला आहे, तो आम्ही सार्थ ठरवू आणि या पतसंस्थेला प्रगतीपथाकडे घेऊन जाऊ असा विश्वास नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्षांनी व्यक्त केला. सहकार विभागातील निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून राजेश चाबुकस्वार यांनी कामकाज पाहिले. संस्थेचे कार्यकारी संचालक सुनिल चौधरी यांनी आभार मानले. यावेळी संस्थेचे खातेदार, सभासद मोठ्या संख्येने हजर होते.

### १९५ गणेश मंडळांना ‘सार्वजनिक गणेशोत्सव २०२६’ मार्गदर्शक माहितीपत्रकांचे वाटप

**आपला उत्सव – आपली जबाबदारी – आपली सुरक्षितता**

ओतूर (समर्थ गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील ओतूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सार्वजनिक गणेशोत्सव २०२६ शांततापूर्ण, सुरक्षित व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडावा, तसेच गणेश मंडळे, कार्यकर्ते व नागरिकांमध्ये कायदा–सुव्यवस्था आणि सामाजिक जबाबदारीबाबत जनजागृती व्हावी, यासाठी पुणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक संदीप सिंग गिल यांच्या संकल्पनेतून ‘सार्वजनिक गणेशोत्सव २०२६ मार्गदर्शक व जनजागृती माहितीपत्रकां’चे वाटप करण्यात आले. ओतूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत एकूण १९५ सार्वजनिक गणेश मंडळे असून, प्रत्येक मंडळास ९५ माहितीपत्रके याप्रमाणे एकूण १८ हजार ५२५ माहितीपत्रकांचे वाटप करण्यात आले आहे. या माहितीपत्रकांमध्ये गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, महिला व बालकांची सुरक्षितता, वाहतूक व्यवस्था, ध्वनी प्रदूषणास प्रतिबंध, अग्निसुरक्षा, आपत्कालीन परिस्थितीत घ्यावयाची काळजी, अमली पदार्थांपासून दूर राहण्याबाबत जनजागृती, सायबर सुरक्षा आणि सामाजिक सलोखा याबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.गणेश मंडळांनी प्रशासन व पोलिस विभागाने दिलेल्या सूचनांचे पालन करून सार्वजनिक शांतता, सामाजिक सलोखा आणि कायदा–सुव्यवस्था राखण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन ओतूर पोलीस स्टेशनच्या वतीने करण्यात आले आहे. गणेशोत्सव हा आनंद, भक्ती आणि सामाजिक एकोपा वाढविणारा उत्सव आहे. त्यामुळे ‘उत्सव आनंदाचा, सुरक्षिततेचा आणि सामाजिक जबाबदारीचा’ या भावनेतून सर्व गणेश मंडळांनी व नागरिकांनी गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. ओतूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे, पोसई युवराज जाधव, पोसई आमणे, पोहवा नरेंद्र गोराणे, पोहवा साबळे, पोहवा सापटे, पोहवा भवारी, पोहवा पालवे, पोहवा कोबल, पोहवा तडवी, पोहवा सुर्यवंशी, मपोहव फापाळे, मपोहवा मधे, पोहवा बांबळे, पोशि रोहित बोंबले, पोशि पवार, मपोशि इनामदार, पोशि जायभाये, पोशि जगताप, मपोशि खोसे, पोशि गोडसे, पोशि बर्डे यांनी पत्रक वाटप करुन मंडळांना मार्गदर्शन केले.

### महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा प्रसार करण्यासाठी सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांचे आवाहन

मुंबई (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्राच्या समृद्ध लोककला आणि गणेशोत्सवाच्या सांस्कृतिक परंपरेचे जतन व प्रसार करण्यासाठी टपाल विभागाने तयार केलेल्या ‘लोककलेतील श्रीगणेश’ या विशेष टपाल तिकिटाचा नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर वापर करावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विकास मंत्री ड. आशिष शेलार यांनी केले. दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज नाट्य मंदिरात आयोजित ‘लोककलेतील श्रीगणेश’ या विशेष कार्यक्रमात मंत्री ड. शेलार यांच्या हस्ते या विशेष टपाल तिकिटाचे अनावरण करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र सर्कलचे मुख्य पोस्टमास्टर जनरल रामचंद्र किसन जायभाये, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक प्रशांत खेडेकर, गणेशभक्त आणि नागरिक उपस्थित होते.

# सुजित झावरे पाटील यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

## पोखरीतील आदिवासी बांधवांना वनहक्काच्या जमिनींचे सातबारा उतारे प्रदान

पारनेर (समर्थ गांवकरी)

पारनेर : पारनेर तालुक्यातील पोखरी परिसरातील आदिवासी बांधवांना वनहक्क कायद्यांतर्गत वनजमिनींचे हक्क मिळवून देण्यासाठी सुजित झावरे पाटील यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. शासन स्तरावर आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधित आदिवासी बांधवांना त्यांच्या हक्काच्या जमिनींचे सातबारा उतारे प्रदान करण्यात आले.

या वेळी पोखरी गावचे सरपंच सतीश पवार पाटील, आदिवासी नेते आनंदराव केदार, राहुल मधे तसेच आदिवासी समाजातील बांधव उपस्थित होते.

**अनेक वर्षांपासून प्रलंबित होता वनहक्काचा प्रश्न**

पोखरी परिसरातील अनेक आदिवासी कुटुंबे पिढ्यान्पिढ्या वनजमिनीवर वास्तव्यास असून संबंधित जमिनीवर त्यांचा पारंपरिक वापर व उपजीविका अवलंबून होती. मात्र, जमिनीच्या मालकी हक्काचा अधिकृत दस्तऐवज नसल्यामुळे या कुटुंबांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेताना अडचणी येत होत्या.

स्वत:चे घर आणि कसण्यासाठी जमीन असूनही अधिकृत हक्कपत्र नसल्याने अनेक कुटुंबे शासकीय सुविधांपासून वंचित राहत होती. त्यामुळे वनहक्क कायद्यांतर्गत त्यांना त्यांच्या हक्काच्या जमिनी मिळाव्यात, अशी मागणी अनेक वर्षांपासून करण्यात येत होती.

**सरपंच सतीश पवार पाटील यांनी मांडला प्रश्न**

पोखरी गावचे सरपंच सतीश पवार पाटील यांनी आदिवासी बांधवांच्या या प्रश्नाकडे सुजित झावरे पाटील यांचे लक्ष वेधले. आदिवासी समाजाचा अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न मार्गी लागण्यासाठी झावरे पाटील यांनी संबंधित यंत्रणांकडे पाठपुरावा सुरू केला.

**ग्रामपातळीपासून शासन स्तरापर्यंत पाठपुरावा**

वनहक्काच्या दाव्यांसाठी आवश्यक कागदपत्रे, प्रस्ताव आणि प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ग्रामपातळीपासून तालुका व जिल्हा पातळीपर्यंत पाठपुरावा करण्यात आला. प्रस्तावांमध्ये कोणत्याही प्रकारची कागदपत्रांची कमतरता राहू नये तसेच प्रस्ताव विहित नमुन्यात शासनाकडे पाठवले जावेत, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांशी समन्वय साधण्यात आला.

तालुका पातळीवरील प्रस्ताव जिल्हा पातळीवर आणि त्यानंतर शासन स्तरावर पाठविण्याच्या प्रक्रियेत सुजित झावरे पाटील यांनी विशेष लक्ष दिले. अखेर शासनाच्या प्रक्रियेनंतर संबंधित आदिवासी बांधवांना वनजमिनीवरील हक्क प्राप्त झाले.

**सातबारा उतारे मिळाल्याने आदिवासी बांधवांना मोठा दिलासा**

वनहक्काच्या जमिनींचे सातबारा उतारे हातात मिळाल्याने आदिवासी बांधवांना त्यांच्या हक्काची अधिकृत नोंद प्राप्त झाली आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या जमिनीच्या प्रश्नाला कायमस्वरूपी स्वरूपात मार्गी लावण्यास मदत झाली आहे.

जमिनीचा अधिकृत हक्क मिळाल्यामुळे संबंधित कुटुंबांना भविष्यात विविध शासकीय योजना



आणि सुविधांचा लाभ घेण्याच्या दृष्टीनेही महत्त्वपूर्ण आधार मिळणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

**इतर गावांतील आदिवासी बांधवांनाही आवाहन**

पारनेर तालुक्यातील इतर गावांमध्येही वनहक्क कायद्यांतर्गत पात्र आदिवासी बांधवांनी आपल्या जमिनीचे प्रस्ताव तयार करून शासनाकडे सादर करावेत, असे आवाहन सुजित झावरे पाटील यांनी केले आहे.

ग्रामपातळीवरून प्राप्त होणारे प्रस्ताव तालुका, जिल्हा आणि राज्य शासनाच्या संबंधित यंत्रणांकडे आवश्यक त्या कागदपत्रांसह पाठविण्यासाठी आपण सहकार्य करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## अमृतवाहिनी सिव्हिल इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्पर्धांमध्ये दमदार कामगिरी

### सात स्पर्धांमध्ये ७ ट्रॉफींसह रोख पारितोषिकांची कमाई

संगमनेर (समर्थ गांवकरी)

अमृतवाहिनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, संगमनेरच्या सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थ्यांनी पुणे येथील अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च येथे आयोजित राष्ट्रीय स्तरावरील विविध तांत्रिक स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश मिळविले. इंजिनिअर्स डे व नॅशनल कॉंक्रिट डे २०२६ निमित्त आयोजित या स्पर्धांमध्ये अमृतवाहिनीच्या विद्यार्थ्यांनी प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ पारितोषिकांसह एकूण ७ ट्रॉफी आणि ₹४१ हजार ५०० रुपयांची रोख पारितोषिके मिळवत महाविद्यालयाचा नावलौकिक वाढविला असल्याची माहिती प्राचार्य डॉ. पी. आर. बाविस्कर यांनी दिली आहे.

याबाबत माहिती देताना ते म्हणाले कि, लोकनेते बाळासाहेब थोरात , सौ शरयुताई देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अमृतवाहिनी महाविद्यालयाने कायम विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीकडे लक्ष दिले आहे. त्यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवले जात असतात. त्याचाच एक भाग म्हणून पुणे येथे आयोजित इंजिनिअर्स डे व नॅशनल कॉंक्रिट डे २०२६ निमित्त आयोजित या स्पर्धांमध्ये अमृतवाहिनीच्या विद्यार्थ्यांनी प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ पारितोषिकांसह एकूण ७ ट्रॉफी आणि ₹४१ हजार ५०० रुपयांची रोख पारितोषिके मिळवली आहेत.

ग्रीन कॉंक्रीट, मिक्स डिझाईन स्पर्धेत दर्शन मालटकर, मयुरेश नारोटे, जय कडाळे, रितेश राठोड व तन्मय आव्हाळे यांच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवत ट्रॉफी व ₹१० हजारांचे पारितोषिक पटकावले. कॉंक्रीट क्यूब टेस्टिंग स्पर्धेत सूरज झोडगे, तुषार पवार, साहिल उगलमुगले, सिद्धांत शिंदे व संकेत वाबळे यांच्या संघाने द्वितीय क्रमांक मिळवत ट्रॉफी व ₹७ हजार ५०० रुपयांचे पारितोषिक मिळविले.सर्व्हे इंग लाइन–आऊट स्पर्धेत दिग्विजय रोहमारे, गौरव साबळे, श्रावणी शिंदे, रिद्धी कोकणे, पूजा शिंदे व राहुल क्षीरसागर यांच्या संघाने



तृतीय क्रमांक मिळवून ट्रॉफी व ₹५ हजार ५०० रुपयांचे पारितोषिक पटकावले. टेक्निकल क्विझमध्ये अथर्व भावसार, विशाखा गांगुर्डे, अनिकेत गीते, वैष्णवी अंकामवार, तर क्यूब टेस्टिंगमध्ये मयुरेश नारोटे, अजय वाळुंजे, दर्शन मालटकर व जय कडाळे यांनी तृतीय क्रमांक मिळवत ट्रॉफी व ₹५ हजार ५०० रुपयांचे पारितोषिक मिळविले. आईस्क्रीम स्टिक ब्रिज स्पर्धेत भक्ती जाधव, संस्कृती गोडसे, ईश्वरी डुकरे, सानिका गाडेकर व आर्यन देशमुख यांच्या संघाने तृतीय क्रमांक मिळवत ट्रॉफी व ₹५ हजार ५०० रुपयांचे पारितोषिक मिळविले.

## शेठ नानजीभाई ठक्कर यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप!



मुंबई (समर्थ गांवकरी)

थोर समाजसुधारक, दानशूर व्यक्तिमत्त्व तथा दैनिक समर्थ गांवकरी वृत्तपत्राचे समूह संपादक शेठ नानजीभाई खीमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना वही, पेन व हरिपाठ पुस्तिकांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

विद्यालयाच्या वतीने शेठ नानजीभाई खीमजीभाई ठक्कर ठाणावाला यांना निरोगी, निरामय व दीर्घायुष्य लाभावे, यासाठी सदिच्छा व्यक्त करण्यात आली. दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या सहकार्याने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी ग्रामस्थ विलास आवरी, विलास बागड, बाळासाहेब आभाळे यांच्यासह ग्रामस्थ व विद्यालयातील शिक्षक उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला हातभार लावणारा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला.

## विकसित भारताचे स्वप्न साकारण्या साठी अभियंत्यांनी नवीन संकल्पनावर संशोधन करावे : अरविंद पारगावकर

### डॉ. विखे पाटील अभियांत्रिकीत पेपर प्रेझेंटेशन स्पर्धा संपन्न

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)





विळद घाट येथील डॉ.विखे पाटील अभियांत्रिकी मध्ये इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) खएख यांच्या सहकार्याने भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त अभियंता दिन साजरा करण्यात आला.

यानिमित्त महाविद्यालयात विविध कार्यक्रमांसह पेपर प्रेझेंटेशन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यावेळी अरविंद पारगावकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की संशोधन व नाविन्यता हा विकसित भारताचा पाया आहे. अभियंत्यांचे तांत्रिक ज्ञान, अभियांत्रिकी औद्योगिक व सामाजिक क्षेत्रातील भरीव योगदान असते. विकसित भारताचे स्वप्न साकारण्या साठी तरुण व नवीन अभियंत्यांनी नवीन संकल्पनांवर संशोधन करावे.असे आवाहन त्यांनी केले.या स्पर्धेला ८० हून अधिक संघांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाचे मुख्यअतिथी श्री.राजेश जग्गी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अभियांत्रिकी क्षेत्रातील बदलत्या तंत्रज्ञाना सोबत सतत शिकत राहणे, व्यावहारिक ज्ञान आत्मसात करणे, समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करणे आणि आपल्या कौशल्यांचा समाजोपयोगी कार्यासाठी वापर करणे आवश्यक असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी केवळ पदवी मिळविण्या पेक्षा ज्ञान, कौशल्य आणि नवोपक्रमाच्या माध्यमातून उत्कृष्ट अभियंता होण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन त्यांनी केले.कार्यक्रमातील प्रमुख वक्ते मॅन्युफॅक्चरिंग एल अँड टी इलेक्ट्रिकल चे माजी उपाध्यक्ष श्री.अरविंद पारगावकर पुढे म्हणाले Engineering Excellence साध्य करण्यासाठी गुणवत्ता, शिस्त, सतत सुधारणा, टीमवर्क, समस्या मुळापासून समजून घेणे आणि Six Sigma, TQM d TPM यांसारख्या पद्धतींचा प्रभावी वापर याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

उद्योगातील आपल्या प्रदीर्घ अनुभवातील उदाहरणे देत त्यांनी उत्कृष्टता ही एकदाच साध्य होणारी गोष्ट नसून सततच्या प्रयत्नातून निर्माण होणारी प्रक्रिया असल्याचे स्पष्ट केले.यावेळी इंजि. भारतभूषण भागवत यांनी अभियंत्यांच्या व्यावसायिक विकासात खएखसारख्या व्यावसायिक संस्थांची भूमिका महत्त्वाची असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

पेपर प्रेझेंटेशन स्पर्धेत विविध अभियांत्रिकी शाखांतील विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण व तांत्रिक विषयांवर संशोधनात्मक सादरीकरण केले.

## ज्येष्ठ प्रवासी वाहतूक चालकांच्या योगदानाचा गौरव

### मुंबई (पूर्व) कार्यक्षेत्रातील ४३ पात्र चालकांना प्रत्येकी १० हजार रुपयांचा सन्मान निधी

मुंबई (समर्थ गांवकरी)

प्रवासी वाहतूक क्षेत्रात दीर्घकाळ सेवा बजावत प्रवाशांची सुरक्षित व सुरळीत वाहतूक सुनिश्चित करणाऱ्या ज्येष्ठ चालकांच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र प्रवासी वाहतूक चालक कल्याणकारी मंडळाच्या निवृत्ती सन्मान योजनेअंतर्गत सन्मान निधी वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या योजनेंतर्गत प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व) यांच्या कार्यक्षेत्रातील वयाची ६५ वर्षे पूर्ण केलेल्या ४३ पात्र सभासदांना प्रत्येकी १० हजार रुपयांचा सन्मान निधी देण्यात आला.

ठाणे येथील गडकरी रंगायतन येथे नुकत्याच झालेल्या या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या हस्ते या सन्मान निधीचे वितरण करण्यात आले. प्रवासी वाहतूक क्षेत्रात प्रदीर्घ काळ सेवा बजावणाऱ्या चालकांच्या योगदानाची दखल घेणे, त्यांच्या सामाजिक व आर्थिक कल्याणाला हातभार लावणे आणि सेवाभावी कार्याचा गौरव करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

**प्रवासी वाहन चालकांना मंडळाचे सभासद होण्याचे आवाहन**

महाराष्ट्र शासनाने २० मे २०२६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र प्रवासी वाहतूक चालक कल्याणकारी मंडळाच्या कार्यक्षेत्राचा विस्तार केला आहे. त्यानुसार विविध प्रकारची प्रवासी वाहने चालविणाऱ्या पात्र बॅज व अनुज्ञप्तीधारक चालकांना मंडळाचे सभासदत्व घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

त्यामुळे ऑटोरिक्षा, टॅक्सी तसेच इतर पात्र प्रवासी वाहन चालकांनी मंडळाचे सभासदत्व घ्यावे, असे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व) यांच्या वतीने करण्यात आले आहे.

तसेच मंडळामार्फत चालकांच्या कल्याणासाठी सन्मान निधी, जीवन व अपंगत्व विमा, आरोग्यविषयक लाभ, कौशल्यवृद्धी, कर्तव्य बजावताना दुखापत झाल्यास अर्थसहाय्य तसेच पाल्यांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती अशा विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत.

मुंबई (पूर्व) प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील ज्या पात्र प्रवासी वाहन चालकांनी अद्याप मंडळाचे सभासदत्व घेतलेले नाही, त्यांनी www.ananddighekalynkarimandal.org या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाइन नोंदणी करावी. संकेतस्थळावर सभासद नोंदणीची प्रक्रिया, पात्रता, आवश्यक कागदपत्रे तसेच विविध कल्याणकारी योजनांची माहिती उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व) येथे संपर्क साधावा, असे प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या प्रादेशिक परिवहन अधिकारी पल्लवी कोठावदे यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# सहकार, सिंचन व शिक्षण क्षेत्रातील बापूंचे योगदान प्रेरणादायी : निरीक्षक बी. के. लगड

## स्व. शिवाजीराव नागवडे यांच्या आठव्या पुण्यतिथीनिमित्त राजीव गांधी विद्यालयात अभिवादन कार्यक्रम

श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)

श्रीगोंदा तालुक्याचे भाग्यविधाते तथा सहकार व शिक्षण महर्षी स्व. शिवाजीराव (बापू) नागवडे यांनी सहकार, सिंचन आणि शैक्षणिक क्षेत्रात दिलेले योगदान तालुक्याच्या विकासासाठी मोलाचे ठरले आहे, असे गौरवोद्गार ज्ञानदीप ग्रामीण विकास शिक्षण संस्थेचे निरीक्षक बी. के. लगड यांनी काढले.

चिखलठाणवाडी (ता. श्रीगोंदा) येथील राजीव गांधी विद्यालयात स्व. शिवाजीराव नागवडे यांच्या आठव्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक श्री ठाणगे, सहकारमहर्षी नागवडे सहकारी साखर कारखान्याचे संचालक भाऊसाहेब नेटके, ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच तथा युवा उद्योजक गणेशराव मैंद, सामाजिक कार्यकर्ते युवराज चिखलठाणे यांच्यासह शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांनी स्व. बापूंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी विविध वक्त्यांनी बापूंच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या सहकार, सिंचन आणि शिक्षण क्षेत्रातील योगदानाच्या आठवणींना उजाळा दिला.

निरीक्षक बी. के. लगड यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना बापूंच्या कार्यातील प्रेरणादायी प्रसंग सांगितले. विद्यालय सक्षमपणे चालवणे आणि विद्यार्थ्यांना न्याय देणे, हीच बापूंना खरी आदरांजली ठरेल, असे त्यांनी सांगितले.

यानंतर मान्यवरांनी विद्यालयाची पाहणी करून शाळेतील कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले. नवनिर्वाचित मुख्याध्यापक श्री नलगे यांनी शाळेचा चेहरामोहरा बदलण्यासाठी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक करत भविष्यात विद्यालयाची गुणवत्ता आणि सोयी–सुविधा अधिक वाढविण्यासाठी सर्वजण कटिबद्ध राहतील, अशी ग्वाही दिली.

यावेळी विद्यार्थ्यांनीही स्व. बापूंच्या व्यक्तिमत्त्वावर मनोगते व्यक्त केली. मुख्याध्यापक श्री नलगे यांनी आपल्या मनोगतात, बापूंमुळे आयुष्याला दिशा मिळाली असून विद्यालयाचा दर्जा उंचावण्यासाठी सातत्याने चांगले काम करणे, हीच त्यांना खरी श्रद्धांजली असेल, असे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री साके यांनी केले, तर श्री अनिकेत लगड यांनी आभार मानले.



## थोडक्यात पण महत्वाचे

### पेमराज सारडा कॉलेजमध्ये हिंदी दिवस उत्साहात साजरा



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

पेमराज सारडा महाविद्यालयात हिंदी विभागाच्या वतीने हिंदी दिवस अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.हिंदी दिवसाचे औचित्य साधून महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धा आणि पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.या दोन्ही स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने भाग घेत आपल्या कलागुणांचे सादरीकरण केले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून श्री जिवाजीराव महादजी शिंदे महाविद्यालयाचे हिंदी विभागप्रमुख डॉ. देवेंद्र बहिरम उपस्थित होते.आपल्या अभ्यासपूर्ण मार्गदर्शनात त्यांनी हिंदी भाषेचे जागतिक स्तरावर वाढत चाललेले महत्त्व विविध उदाहरणांच्या माध्यमातून विशद केले.हिंदीच्या प्रचार आणि प्रसारामध्ये महाराष्ट्राचे योगदान नेहमीच ऐतिहासिक आणि मोठे राहिले आहे,असे प्रतिपादन त्यांनी या वेळी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित होत्या. आपल्या अध्यक्षीय मनोगतात भाषेचे महत्त्व अधोरेखित करताना त्या म्हणाल्या की,आपण कोणत्याही भाषेचा द्वेष न  करण्याचे आवाहन केले.

### राजूर येथे २९ सप्टेंबरला 'महाकुंभ रोजगार मेळावा'

**युवकांना थेट रोजगाराची संधी!**

राजूर (समर्थ गांवकरी)

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार राघोजी भांगरे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्र राजूर, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र मवेशी, केळी–कोतुळ आणि ड. एम. एन. देशमुख महाविद्यालय, राजूर यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, २९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता बेरोजगार युवकांसाठी 'महाकुंभ रोजगार मेळावा' आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. भाऊसाहेब देशमुख व प्राचार्य गवळी यांनी दिली. या रोजगार मेळाव्यात विविध नामांकित कंपन्या, आस्थापना, सहकारी संस्था, बँका तसेच वैद्यकीय व शिक्षण क्षेत्रातील संस्थांचे प्रतिनिधी सहभागी होणार असून उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येणार आहेत. निवड झालेल्या उमेदवारांना त्याचवेळी नियुक्तीपत्र देण्यात येणार असल्याची माहिती रोजगार मेळावा समन्वय समितीचे अध्यक्ष प्राचार्य गवळी यांनी दिली. तालुक्यातील बेरोजगार युवकांना रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध करून देणे तसेच रोजगाराच्या विविध क्षेत्रांची माहिती मिळावी, या उद्देशाने मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. इच्छुक युवकांनी २९ सप्टेंबर रोजी ड. एम. एन. देशमुख महाविद्यालय, राजूर येथे उपस्थित राहून या रोजगार मेळाव्याचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य प्रो. डॉ. भाऊसाहेब देशमुख व प्राचार्य गवळी यांनी केले आहे.

### दरवर्षीप्रमाणे गणरायाला वाजत-गाजत व भावपूर्ण निरोप

**परंपरेप्रमाणे 'मॉडर्न' विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रमाचे नेत्रदिपक सादरीकरण**



अकोले (समर्थ गांवकरी)

येथील मॉडर्न हायस्कूल ज्युनिअर कॉलेज दरवर्षीप्रमाणे या वर्षी देखील गणरायाला सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून निरोप देण्यात आला. लेझीम, टिपरी, आदिवासी नृत्य, पावरी नृत्य, पथनाट्य हे नेत्रदीपक कार्यक्रम सादर करून अकोल्याच्या प्रेक्षकांचे मनोरंजन केले.

अकोले शहरातून गणरायाची वाजत गाजत मिरवणूक विद्यालयाच्या वतीने काढण्यात आली होती. सांस्कृतिक कार्यक्रम महात्मा फुले चौक, नगरपंचायत परिसर या ठिकाणी विद्यार्थ्यांनी सादर केले. विद्यालयाचे सांस्कृतिक कार्यक्रम पाहण्यासाठी हिं. से. मंडळाचे स्थानिक पदाधिकारी,चेअरमन,सर्व स्थानिक स्कूल कमिटी पदाधिकारी उपस्थित होते.सर्व कार्यक्रमाचे नियोजन विद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, उपमुख्याध्यापक,पर्यवेक्षक यांनी केले. सूत्रसंचालन गणेश जोशी  यांनी केले. कार्यक्रम सादरीकरणानंतर गणरायाला भावपूर्ण निरोप देण्यात आला. विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मिरवणूक सुरळीत पार पाडण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# बालविवाह प्रबोधन करणारा जिवंत देखावा

## DYSP दिलीप टिपरसे यांनी केले कौतुक

**■'रस्ता बदलायला हवा – बालविवाह थांबवा – बालपण वाचवा!'चा प्रभावी संदेश**




अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

दिनांक २३ सप्टेंबर २०२६, वंचित, शोषित आणि गरजू समाजघटकांना न्याय व सुरक्षितता मिळवून देण्यासाठी गेल्या ३८ वर्षांपासून कार्यरत असलेल्या स्नेहालय संस्थेच्या माध्यमातून महिला व बालकांच्या संरक्षणासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. याच कार्याचा विस्तार म्हणून स्नेहालय संचलित उडान – बालविवाह मुक्ती मिशनच्या माध्यम ातून जनजागृती, प्रतिबंधात्मक उपाय आणि पुनर्वसन या तीन प्रमुख उद्दिष्टांसह अहिल्यानगर जिल्हा २०२७ अखेरपर्यंत बालविवाहमुक्त करण्याचे ध्येय ठेवण्यात आले आहे.

गणेशोत्सवानिमित्त शहरातील विविध गणेश मंडळांकडून सामाजिक विषयांवर देखावे व जनजागृतीपर उपक्रम राबविले जात आहेत. याच पार्श्वभूमीवर स्नेहालय संचलित उडान प्रकल्प आणि स्वामी विवेकानंद तरुण मंडळ ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने 'रस्ता बदलायला हवा – बालविवाह थांबवा – बालपण वाचवा!' हा जिवंत देखावा साकारण्यात आला आहे.

बालविवाहामागील सामाजिक व कौटुंबिक कारणे, बालविवाहामुळे बालकांच्या जीवनावर होणारे परिणाम, बालविवाह प्रतिबंधक कायदा तसेच बालविवाह रोखण्यासाठी पालक, नागरिक, ग्रामपंचायत, पोलीस व प्रशासनाची भूमिका या विविध बाबी प्रत्यक्ष प्रसंगांच्या माध्यमातून या देखाव्यात मांडण्यात आल्या आहेत. त्यामुळे हा देखावा केवळ मनोरंजनाचा विषय न राहता 'बालविवाह थांबविण्यासाठी आपण काय करू शकतो?' हा प्रश्न नागरिकांसमोर उभा करणारा प्रभावी समाजप्रबोधनाचा उपक्रम ठरत आहे.

DYSP दिलीप टिपरसे यांनी केले कौतुक

दरम्यान, अहिल्यानगर शहराचे उपाध्यक्ष दिलीप टिपरसे यांनी स्वामी विवेकानंद तरुण मंडळास भेट देऊन गणरायाची आरती केली. त्यानंतर त्यांनी स्नेहालय उडान प्रकल्प आणि स्वामी विवेकानंद तरुण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने सादर करण्यात आलेला जिवंत देखावा पाहिला.

देखाव्यातून बालविवाहासारख्या गंभीर सामाजिक प्रश्नाची करण्यात आलेली प्रभावी मांडणी पाहून टिपरसे यांनी उपक्रमाचे कौतुक केले. हा देखावा अत्यंत प्रबोधन करणारा असून सामाजिक विषय नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता आहे, असे त्यांनी नमूद केले.

यावेळी त्यांना स्नेहालयच्या बाल भवन प्रकल्पाची सविस्तर माहिती देण्यात आली. बालकांच्या संरक्षणासाठी, मार्गदर्शनासाठी, समुपदेशनासाठी आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी बाल भवनाच्या माध्यमातून सुरू असलेल्या कामाची माहिती त्यांनी जाणून घेतली.

बालसुरक्षेच्या क्षेत्रात पोलीस विभाग आणि स्नेहालय यांच्या समन्वयातून भविष्यात विविध उपक्रम राबविता येतील, याबाबतही यावेळी चर्चा झाली. बाल भवन प्रकल्पाला प्रत्यक्ष भेट देणार असल्याचे DYSP दिलीप टिपरसे यांनी सांगितले.

तसेच हा प्रबोधनपर जिवंत देखावा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावा यासाठी कुटुंबीयांनी तसेच शहरातील विविध पोलीस ठाण्यांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही हा देखावा पाहावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## नेवासा प्रभागातील गायत्रीनगर येथे सहजयोग ध्यानधारणेचा कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसादर

नेवासा (समर्थ गांवकरी)

नेवासा प्रभागातील गायत्रीनगर येथे श्री गणेश आनंदोत्सव मंडळाच्या वतीने गणेशोत्सवाचे औचित्य साधून आयोजित सहजयोग ध्यानधारणेचा कार्यक्रमाला गणेश भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कुंडलिनी शक्ती जागृती शिवाय परमेश्वराची भक्ती अपुर्ण आहे.कुंडलीनी शक्ती जागृतीने आपल्यातील आत्मा जागृत होतो व आत्म जागृतीने निराकारात पसरलेल्या निर्गुण परमतत्वाशी आपली ओळख होते, मग आपण श्रध्देने मारलेली एक हाक सुध्दा परमेश्वरापर्यंत जाऊन पोहोचते व त्याचा पुरावा म्हणजे आपले तळहातावर टाळुवर चैतन्य लहरींची जाणिव होते व त्याद्वारे आपल्याला सुखशांती व आनंदाची प्राप्ती होते, आपल्या संपुर्ण जीवनाचे कल्याण होते असे प्रतिपादन सहजयोगी अरविंद पवार यांनी यावेळी बोलतांना केले.



नेवासा प्रभाग क्रमांक पाचमध्ये असलेल्या गायत्रीनगर या ठिकाणी झालेल्या सहजयोग ध्यान धारणेच्या कार्यक्रम प्रसंगी परमपूज्यनिय माताजी श्री निर्मलादेवी प्रणित सहजयोगाचे कार्य जगातील १६० हुन अधिक देशात चालते, सहजयोग मार्गदर्शन घेऊन ध्यानधारणेद्वारे अनेकांनी तणाव मुक्त झाल्याचे मान्य केले आहे

ध्यान धारणेने आरोग्यात सुधारणा होते,मानसिक संतुलण मिळते,विद्यार्थ्यांचे मन एकाग्र होऊन त्याचे गुणवत्तेत निश्चितपणे वाढ होते.

शेतीचे उत्पन्नात वाढ होते असे सिध्द झाल्याने माताजींना अनेक पुरस्कार बहाल केले आहेत.आपल्या सरकारने श्री माताजींना विश्वशांतीसाठी केलेल्या कामासाठी पद्मभुषनाने सन्मानित केले असल्याचे अरविंद पवार यांनी यावेळी बोलतांना सांगितले.

गायत्रीनगर येथे झालेल्या सहजयोग ध्यान धारणा कार्यक्रमाला साधकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

## 'स्वरार्जुन'मधून उलगडणार महाभारताचा सांगीतिक प्रवास

मुंबई (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या वतीने 'स्वरार्जुन' या विशेष सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, २६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता विलेपार्ले (पूर्व), मुंबई येथील मा. दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह येथे हा कार्यक्रम होणार आहे.

'स्वरार्जुन' हा एक सांगीतिक महाभारत प्रवास असून, गीत, संगीत आणि कथा यांचा सुरेख संगम या कार्यक्रमातून अनुभवता येणार आहे. महाभारतातील विविध प्रसंग, व्यक्तिरेखा आणि प्रेरणादायी जीवनमूल्ये संगीत व कथनाच्या माध्यमातून रसिकांसमोर सादर करण्यात येणार आहेत.

कार्यक्रमात संगीत – माधुरी नाईक, निवेदन – श्रीराम केळकर आणि कवी – श्रीरंग (श्रीपाद सहस्त्रबुद्धे) यांचा सहभाग आहे. सोमेश नार्वेकर, केतकी चैतन्य आणि धनंजय म्हसकर हे गायक कलाकार सादरीकरण करणार आहेत.

वाद्यवृंदामध्ये तबला – अमेय ठाकूरदेसाई, पखवाज – हनुमंत रावडे, तालवाद्य – गंधर्व पाटील व संतोष पेडेकर, बासरी – विजय तांबे, सतार – पंडित उमाशंकर शुक्ल, की–बोर्ड – झंकार कानडे व अक्षय कावळे यांचा सहभाग आहे. संकल्पना व निर्मिती – वैभव केळकर व डॉ. मेघना दलाल असून, संगीत संयोजन – सोमेश नार्वेकर व अमेय ठाकूरदेसाई यांनी केले आहे. हा सांस्कृतिक उपक्रम सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला आहे.

## एकल महिलांच्या हस्ते गणपतीची आरती; सामाजिक समतेचा संदेश!

अकोले (समर्थ गांवकरी)



धार्मिक कार्यक्रमांमध्ये विधवा व एकल महिलांना दूर ठेवण्याच्या प्रथेला छेद देत साऊ एकल महिला समितीच्या पुढाकारातून अकोले, तांभोळ, वाशेरे, समशेरपूर, सुगाव आणि ब्राम्हणवाडा येथील गणेश मंडळांनी एकल महिलांच्या हस्ते गणपतीची आरती आयोजित केली. आरतीचा मान देऊन एकल महिलांना सामाजिक प्रतिष्ठा देण्याचा प्रयत्न या उपक्रम ातून करण्यात आला. स्वातंत्र्यदिनी राज्यातील विविध ठिकाणी एकल महिलांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले होते. त्याच उपक्रमाला जोड देत गणेशोत्सवात एकल महिलांच्या हस्ते आरतीचे आयोजन करण्यात येत आहे, अशी माहिती साऊ एकल महिला समितीच्या प्रतिमा हेरंब कुलकर्णी यांनी दिली. आरतीचा मान हा सामाजिक प्रतिष्ठेशी जोडलेला असल्याने तो मान एकल महिलांना देणे हा समानतेचा सकारात्मक संदेश असल्याचे त्यांनी सांगितले.

## शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दुष्काळाची पहिली अधिसूचना लवकरच**

लातूर (समर्थ गांवकरी)

शासनाने दुष्काळाची परिस्थिती अतिशय गांभीर्याने घेतली आहे. शासन दुष्काळाची पहिली अधिसूचना लवकरच प्रसिद्ध करणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले.

लातूर, धाराशीव जिल्ह्यातील पीक–पाणी परिस्थितीच्या पाहणीसाठी मुख्यमंत्री फडणवीस यांचे आज लातूर विमानतळावर आगमन झाले, यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

दुष्काळाच्या अनुषंगाने करावयाच्या आवश्यक त्या उपयोजनांबाबत शासनस्तरावर योग्य कार्यवाही सुरू आहे. तसेच दुष्काळासंदर्भातील अहवाल शासनास प्राप्त झालेले आहेत. सध्याची परिस्थिती अतिशय गंभीर आहे. शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत शासन करत आहे. सोबतच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभही देण्यात येत आहे. यासाठी आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.



# महाराष्ट्राच्या लोककला आणि श्रीगणेश भक्तीने लखनऊ दुमदुमले

## 'लोककलेतील श्रीगणेश' या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाने रसिक प्रेक्षक मंत्रमुग्ध

मुंबई (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या सहकार्याने लखनऊ येथे आयोजित करण्यात आलेल्या 'लोककलेतील श्रीगणेश' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे अत्यंत भव्य, प्रभावी आणि दर्जेदार सादरीकरण झाले. महाराष्ट्राची समृद्ध लोककला, लोकपरंपरा, संगीत, नृत्य आणि श्रीगणेश भक्तीच्या विविध रंगछटांनी सजलेल्या या कार्यक्रम ातून लखनऊच्या रसिक प्रेक्षकांना महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचा अनुभव मिळाला.

राय उमनाथ बली प्रेक्षागृह, कैसरबाग, लखनऊ येथे आयोजित या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून उत्तर प्रदेश विधान परिषदेचे आमदार पवन सिंह चौहान, भातखंडे संस्कृती विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. मांडवी सिंह, निखिलेश लखनवी, बिरजू महाराज कथक संस्थान, लखनऊच्या अध्यक्षा श्रीमती कुमकुम घर, उपाध्यक्षा श्रीमती निखिलेश तिवारी, उत्तर प्रदेश सांस्कृतिक विभागाचे माजी कार्यक्रम कार्यकारी अधिकारी कमलेश पाठक तसेच संगीत नाटक अकादमीचे माजी अध्यक्ष श्री. अचेलाल सोनी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थित रसिक प्रेक्षकांनी महाराष्ट्राच्या लोककलांचे उत्कृष्ट आणि प्रभावी सादरीकरणाची प्रशंसा केली. आणि.कार्यक्रमाच्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल उपस्थित मान्यवरांनी महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाचे मंत्री ड आशीष शेलार तसेच सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. महाराष्ट्राची लोककला आणि सांस्कृतिक परंपरा देशाच्या विविध भागांपर्यंत पोहोचविण्याच्या या उपक्रमाचेही उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.

लोककलांच्या विविध रंगछटांनी सजलेला मंच

'लोककलेतील श्रीगणेश' या कार्यक्रमात महाराष्ट्राच्या विविध पारंपरिक लोककलांचे अत्यंत सुंदर आणि प्रभावी सादरीकरण करण्यात आले. गणेशवंदना, नमन, ओवी, मंगळागौर, गोंधळ, बाल्या नृत्य, गौरी–गणपतीवरील हिंदी रचना व भजन, संगीतमय नृत्यनाट्य तसेच वाद्यवृंदाच्या साथीने सादर करण्यात आलेला श्रीगणेश नृत्यकलाविष्कार अशा विविध सादरीकरणांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

कलाकारांनी आपल्या उत्कृष्ट नृत्य कलाविष्कारातून, अभिनयातून, पारंपरिक वेशभूषा, संगीत आणि नृत्याच्या माध्यमातून महाराष्ट्राची लोकपरंपरा लखनऊच्या मंचावर जिवंत केली. यावर्षी गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सव' म्हणून घोषित करण्यात आले आहे. या निमित्ताने महाराष्ट्राची समृद्ध लोककला, लोकपरंपरा आणि लोकसंस्कृती महाराष्ट्राच्या सीमांपलीकडे देशाच्या विविध भागांत सादर करण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

याच संकल्पनेतून 'लोककलेतील श्रीगणेश' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या विविध लोककला आणि सांस्कृतिक परंपरांचे देशातील विविध राज्यांमध्ये सादरीकरण करण्यात येत आहे.

महाराष्ट्राची ओळख केवळ त्याच्या इतिहास, परंपरा आणि सांस्कृतिक वैभवामुळेच नव्हे, तर त्याच्या समृद्ध लोककला आणि लोकपरंपरांमुळेही आहे. महाराष्ट्राच्या या अमूल्य सांस्कृतिक वारशाची देशभरातील रसिकांना ओळख करून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे. देशाच्या विविध भागांत राहणाऱ्या कला आणि संस्कृतीप्रेमींना महाराष्ट्राच्या लोककलेचा प्रत्यक्ष अनुभव देण्याबरोबरच विविध राज्यांतील कलाकार आणि रसिक यांच्यात सांस्कृतिक संवाद व आदान–प्रदानाला प्रोत्साहन देणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

महाराष्ट्राच्या लोकपरंपरेचे संरक्षण, संवर्धन आणि पुढील पिढीकडे हस्तांतरण करण्याबरोबरच महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख देशभर व्यापक स्वरूपात पोहोचविण्याचे कार्य या माध्यमातून केले जात आहे. या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे समन्वय श्रीकृष्ण कला फाऊंडेशन यांनी केले. फाऊंडेशनच्या कलाकारांनी आपल्या उत्कृष्ट कलाविष्कारातून महाराष्ट्राच्या लोककलेची समृद्ध परंपरा लखनऊच्या मंचावर प्रभावीपणे सादर केली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ–१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)/
कोकण विभागीय कार्यालयाचा पत्ता : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र. २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९